

गणपती बाप्पा मोरया

दैनिक राज्य लोकतंत्र

गणपती बाप्पा मोरया



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१२८ | मंगळवार, दि.०२ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# नमो शेतकरी महा सन्मान योजनेत शेतकऱ्यांची फसवणूक!

## एकविसाव्या हप्त्याचे वितरण लांबल्याने शेतकऱ्यांना टाकल्या जाताहेत बनावट लिंक

पुणे | प्रतिनिधी

राज्यातील ९६ लाख शेतकऱ्यांची नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सातव्या हप्त्याची प्रतिक्षा अद्यापही कायम आहे. एकीकडे हे असताना दुसरीकडे, पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २० हप्त्याचं वितरण होऊन आता महिना होत आला आहे, परंतु अद्यापही नमोचा २१ वा हप्ता मात्र सरकारकडून



वितरित करण्यात आला नाही. त्यामुळे या योजनेवरून शेतकऱ्यांमध्ये गोंधळ निर्माण झालेला आहे. त्याचा फायदा उचलत शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. पीएम किसान योजनेच्या २० व्या हप्त्याला विलंब झाला होता, त्यावेळी शेतकऱ्यांना फेक मेसेज, फोन कॉल्स करून लिंक पाठवली जात होती. त्या लिंकवर क्लिक करताच संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यातील रक्कम गायब केली जात होती. आता २१ व्या नमोच्या वितरणाला विलंब झाला आहे. त्यामुळे याच ट्रिक्सचा वापर करून शेतकऱ्यांची फसवणूकीचे प्रयत्न केले जात पान २ वर

### योजना बंद केल्याची अफवा...

कृषी विभागाने प्रस्ताव पाठवून अद्यापही अर्थ विभागाने नमोच्या सातव्या हप्त्यासाठी निधी वितरणास मान्यता दिली नाही. त्यामुळे नमो योजना बंद करण्यात आल्याच्या अफवा पसरली आहे. तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर योजना सुरु झाली होती. परंतु आता मात्र या योजनेची गरज संपली आहे, त्यामुळे राज्य सरकार योजना बंद करणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. परंतु राज्य सरकारने मात्र याबद्दल अधिकृत घोषणा केली नाही. त्यामुळे योजना सुरु असल्याचा दावाही अभ्यासक करत आहेत.

# मुंबई उद्या दुपारपर्यंत रिकामी करा हायकोर्टाचे राज्यसरकारला आदेश

मुंबई | प्रतिनिधी

**जरांगे पाटील वीरेंद्र पवार यांना आंदोलन पुढे चालू ठेवण्याची परवानगी नाही. त्यामुळे ज्या काही कायद्यात तरतुदी आहेत, त्यानुसार राज्य सरकारने पावलं उचलावीत. उद्या सायंकाळी चार वाजेपर्यंत रस्ते खाली करावेत असा महत्त्वाचा आदेश हायकोर्टाने दिला आहे. आझाद मैदानाव्यतिरिक्त सगळी जागा उद्या दुपारपर्यंत खाली करावी असे आदेश हायकोर्टाने दिले आहेत.**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचं मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरु आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज (१



सप्टेंबर) चौथा दिवस आहे. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाकडून आज (१ सप्टेंबर) तातडीची पान २ वर

### कोणाला त्रास होईल असं वागू नका

मुंबईकरांना त्रास होईल असं वागू नका, कुणाचं ऐकून गोंधळ घालू नका असं आवाहन जरांगे यांनी केलं. मुंबईच्या रस्त्यांवर असलेल्या गाड्या आझाद मैदानाच्या बाजूच्या क्रॉस मैदानात लावा, तिथेच झोपा असंही जरांगे म्हणाले. जर कुणी ऐकणार नाही तर त्याने गावाकडे परत जावं, कुणाच्या आदेशावर हुल्लडबाजी करणाऱ्यांना स्थान नाही. मी शेवटचं सांगतोय, आंदोलनाला बदनाम करू नका अन्यथा सोडणार नाही असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला.

### मराठा आरक्षणावर तोडगा निघणार?

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यामुळे राजकीय वातावरणही तापलं आहे. ठिकठिकाणी राज्यात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज वर्षा बंगल्यावर महत्त्वाची बैठक सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थितीत तोडगा काढण्यासाठी चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# मराठा कुणबीच्या सर्वात कमी नोंदी मराठवाड्यात

बीड | प्रतिनिधी

**मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर एकनाथ शिंदे यांच्या सरकाने राज्यातील कुणबी नोंदी शोधण्यासाठी माजी न्या. संदीप शिंदे यांच्या समितीची स्थापना केली होती. मराठा आणि कुणबी यांच्यात ऐतिहासिक व सामाजिक संबंध आहेत आणि मराठवाड्यातून कुणबी नोंदी शोधून मराठा समाजाला कुणबी दाखले मिळवून देण हा शिंदे समितीचा उद्देश या समितीने राज्यातल्या तब्बल ५८ लाख ८३ हजार ४१६ कुणबी नोंदी शोधल्या आहेत. मात्र सर्वात कमी नोंदी मराठवाड्यात सापडल्या आहेत.**

- राज्यात ५८ लाख नोंदी शोधल्या
- राज्यात १० लाख प्रमाणपत्राचे वाटप
- नाशिक विभागात सर्वाधीक नोंदी सापडल्या

मराठवाड्यात सर्वात कमी ४७ हजार ८४५ नोंदी सापडल्या आहेत. शिंदे समितीने शोधलेल्या कुणबी नोंदीच्या आधारे राज्यभरात दहा लाख ३५ हजार ४७९ जात प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे. यातील मराठवाड्यात दोन लाख ३९ हजार २१ जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. सर्वाधिक ३ लाख ३२ हजार २४ हजार जात प्रमाणपत्राचे वाटप नाशिक महसूल विभागात केले आहे. त्यापैकी अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पान २ वर

## मराठा आंदोलकांसमोर मुंबई मनपा हतबल तीन दिवसांत २२ मेट्रिक टन कचरा उचलला

मुंबई | प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. आजपासून त्यांनी पाणीही पिणार नसल्याचे सांगितले आहे. राज्य सरकारसोबतच्या चर्चा यशस्वी होत नसल्याने हे आंदोलन लांबत चालले आहे. आंदोलन लांबल्याने आंदोलकांची प्रचंड गैरसोय होऊ लागली आहे. पाऊस असल्याने सोबत आणलेले कपडे, गाद्या हे साहित्य भिजले आहे.यातील सर्वात मोठी अडचण आहे ती म्हणजे कच-याची. आंदोलन स्थळी आझाद मैदान ते सीएसटी परिसरासह मुंबईत अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. ३ दिवसांपासून कच-याने पान २ वर

# परळीतील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा नराधाम पकडला



परळी | प्रतिनिधी

पंढरपूर येथून आपल्या मुलाबाळासह परळी रेल्वे स्थानकावर आलेल्या एका कुटुंबातील सहा वर्षाच्या बालिकेला रेल्वे रूळाजवळच्या पुलाजवळ नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आपली सूत्रे हलवून या नराधमाला ताब्यात घेतले.

दिनांक ३१/०८/२०२५ रोजी पंढरपूर येथुन एक कुटुंब मुलाबाळांसह परळी येथे आले होते. दुपारी १५:०० वाजेच्या सुमारास रेल्वे स्टेशनवरच जेवण करून सदरचे कुटुंब झोपी गेले होते. पान २ वर

# अंतरवाली सराटीमध्ये ओबीसींचे आंदोलन




अंबड | प्रतिनिधी


ज्या अंतरवाली सराटी गावातून मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनाची धग तीव्र केली त्याच गावात आजपासून ओबीसी समाजाने आंदोलन सुरू केले आहे. मनोज जरांगे पाटील यांची मुख्य मागणी मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याची आहे. या मागणीला विरोध करून ओबीसी आरक्षण वाजवण्यासाठी ओबीसींनी अंतरवाली सराटी गावात साखळी उपोषणाला आजपासून (१ सप्टेंबर) सुरुवात केली आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून मुंबईच्या आझाद मैदानात बेमुदत उपोषणाला बसले आहे. आज (१ सप्टेंबर) जरांगे पाटील पान २ वर

# ओबीसींवर अन्याय झाला तर लाखोंच्या संख्येने मुंबईत येणार-छगन भुजबळ

मुंबई | प्रतिनिधी

मराठा आणि कुणबी एक आहे हा मूर्खपणा असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. मराठा समाज हा मागास नाही असे निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळं मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देता येणार नाही. मराठा कुणबी एक



होऊ शकत नाही असं वक्तव्य मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. ५० टक्के आरक्षण हे सामाजिकदृष्ट्या मागास असणाऱ्यांसाठी आहे. पण मराठा समाज हा सामाजिक मागास ठरत नाही असे भुजबळ म्हणाले. आमच्या ओबीसीच्या आरक्षणात दुसरे वाटेकरी नको असेही भुजबळ म्हणाले. शरद पवार असो की देवेंद्र पान २ वर

# कायद्याच्या चौकटीत मराठा-ओबीसी आरक्षण वाद

राज्य लोकतंत्र

भाग चौथा | सुभाष चौरे

**पुणे-बीड : गणपती बाप्पा आपल्या आगमनाला पाच दिवस पूर्ण होत आहेत या पाच दिवसात आपण बरंच काही पाहिलं असेल खेड्यापासून मेट्रो सिटी पर्यंत अनेक अडचणी अनेक समस्या आहेत मात्र त्यावर सध्या फोकस नाही फोकस आहे तो आझाद मैदानावरील आरक्षणावर कायद्यानुसार कायद्यात बसणारे आरक्षण मराठा समाजाला हवं तेही सरसकट मराठा समाजाला मात्र त्याला ओबीसी समाज कडकडून विरोध होत आहे या कात्रीमध्ये सरकार सह विरोधी पक्ष नेतेही पडले आहेत कायद्याच्या चौकटीतच पण टिकणार आरक्षण ते मराठा समाजाला मिळावं हीच अपेक्षा आंदोलकांची जाणकारांनी आहे पण कायदा काय सांगतो ,हे देव बाप्पा तुम्हाला माहीतच आहे यातूनही आता मार्ग काढण्याची गरज आहे कारण पुन्हा दोन समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये म्हणून.**

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे यासाठी जरांगे पाटील यांनी पाच वेळा आमरण उपोषण केले ३१ मे २०२५ रोजी शासनाने जरांगे पाटील यांची समजूत काढली होती मात्र मागण्या मान्य न झाल्याने जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता, त्या काळात सरकारने काहीच केले नाही म्हणून मुंबई मोहीम राबवली गेली गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे ही सर्वांचीच अपेक्षा आहे मात्र यावर सरकार आणि विरोधी पक्ष नेते आपली राजकीय पोळी भाजून घेताना दिसत आहेत एकीकडे ओबीसी आरक्षण कमी होत असल्याची भीती दाखवायचे दुसरीकडे ते मतात विभाजन करायचे त्यातही विरोधी पक्षाचे नेते फक्त आरक्षण मिळाले पाहिजे एवढेच म्हणतात परंतु ठोस भूमिका घेताना कोणीच दिसत नाहीत अशात सरकार आणि विरोधी पक्षाची भूमिका गोलमाल दिसत असल्याने आंदोलन देखील विचलित झाले आहेत मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने मागील काळात दिलेल्या काही निर्णयामुळे मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करण्यास अडचणी निर्माण होत आहे त्याला कारणेही तसेच आहेत , कर्नाटक सरकारने आपला आरक्षणाचा कोठा ५०% वरून ६५ टक्के पर्यंत केला मग महाराष्ट्र सरकारला हे करायला काय अडचण आहे मात्र यातही कायद्याची बाजू आहे सर्वोच्च न्यायालयाने यावर म्हणजेच ५०% च्या आरक्षणाबाबत निर्णय पान २ वर



## थोडक्यात...

### सोन्या, चांदीच्या दरात मोठी वाढ

जळगाव : जळगावच्या सराफ बाजारात सोन्याच्या किमतीने १ लाख ७ हजारांचा टप्पा ओलांडला आहे, जो विक्रमी आहे. गेल्या २४ तासांत सोन्यात ११०० रुपयांची आणि चांदीत ३००० रुपयांची वाढ झाली आहे.सध्या सणासुदीच्या काळात तर सोने खरेदीला उधाण आले आहे. गेल्या काही महिन्यांपासून सटासट वाढत जाणारे सोन्याचे दर पाहून छाती दडपून जाते, पण सोनखरेदीचा लोकांचा उत्साह काही कमी होती नाही. त्यामुळे हाच ट्रेंड कायम राखत आजही सोन्या-चांदीच्या दरात चांगलीच वाढ झाली असून अवघ्या २४ तासांत सोन्याची किंमतीने उच्चांक गाठला आहे.

### सीमेवर शांतता दहशतवादाविरुद्ध मतैक्य

तियानजीन : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनमधील तियानजिन येथे शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर संमेलनात (एससीओ) भाग घेतला, त्यावेळी त्यांची चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी चर्चा झाली. एका वर्षापेक्षा कमी कालावधीत या दोन नेत्यांची ही दुसरी भेट होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात या बैठकीत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. विशेषत: सीमेवर शांतता आणि दहशतवादाविरोधात भारताला साथ देण्याबाबत मतैक्य झाले.

### झेपत नसेल तर राजीनामा द्यावा

मुंबई : मराठा आरक्षण आंदोलन जर यांना सांभाळता येत नसेल, कायदा सुव्यवस्था राखता येत नाही तर मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, महाराष्ट्राचे सरकार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात कमी पडत असेल तर हे सरकार हटवले पाहिजे. राज्यात आणि राज्याच्या राजधानीत महिला जर सुरक्षित नसतील तर गृहखाते काय करत आहे. या सरकारची गुप्तचर यंत्रणा काय करत आहे. गृहमंत्र्यांना जर हे झेपत नसेल तर त्यांनी राजीनामा द्यावा असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारवर केला आहे.

### आरक्षणासाठी स्वत:चं आयुष्य संपवलं

बीड : मंबई येथील आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांचं मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे. मनोज जरांगे पाटील यांनी 'चलो मुंबईचा' नारा दिल्यानंतर प्रत्येक मराठा बांधव त्यांच्या मोर्चामध्ये सहभागी झाला. मात्र बीडच्या आहेरवडगाव येथील भरत खरसाडे या तरुणाला मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चामध्ये सहभागी व्हायची तीव्र इच्छा होती. मुंबईला जाण्यासाठी खिशात पैसे नसल्यामुळे आणि घरची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे वडिलांनी पैसे दिलेच नाही. या नैराश्यात तरुणाने टोकाचं पाऊल उचलत आत्महत्या केली आहे.

### महिनाभरातच जमा झाले १.८६ लाख कोटी

नवीदिल्ली : देशाच्या तिजोरीत मोठी भर पडली आहे, जीएसटी संकलनात मोठी वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये जीएसटी संकलनाचा आकडा हा १.८६ लाख कोटी रुपयांवर गेला आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट २०२४ मध्ये जीएसटी संकलन १.७५ लाख कोटी रुपये होते. यावर्षी मात्र, यामध्ये ६.५ टक्क्यांची वाढ झाली आहे. जर आपण गेल्या महिन्याची म्हणजेच जुलै २०२५ ची तुलना केली तर जुलैमध्ये जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपये होते, जे ऑगस्टपेक्षा जास्त आहे. ऑगस्ट महिन्यात जुलै महिन्यापेक्षा जीएसटी संकलनात किंचीत घट झाली आहे.

### कुणबी आणि मराठा वेगळेच;ओबोसी नेते

मुंबई : कुणबी आणि मराठा हे वेगळे असून मराठा समाज सामाजिक दृष्ट्या पुढारलेला आहे. त्यामुळे त्यांनी कुणबी मराठा म्हणून किंवा मराठा म्हणून कुणबी प्रमाणपत्र देखील घेऊ शकत नाही.सुप्रीम कोर्टाने ती मागणी फेटाळून लावली. मराठा समाजाने ८ टक्के आरक्षण घेतले आहे. एसईबीसी आरक्षण देखील यांना मिळाले आहे. ईडब्ल्यूएस आरक्षण देखील यांच्याकडे आहे आणि तरी आणखी आरक्षण यांना हवे आहे ते कसे काय मिळू शकेल? हे शक्य होणार नाही. दंडुकेशाहीवर देखील हे आरक्षण घेऊ शकणार नाहीत, असे प्रकाश शेंडगे म्हणाले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

## अग्रलेख

# जरांगे फॅक्टर घाम फोडतोय...!

मराठा आरक्षणाच्या लढ्यात एक मोठी वस्तुस्थिती दिसून आली, ती म्हणजे जरांगे-पाटील फॅक्टर. मनोज जरांगे-पाटील या एका साध्या शेतक-याने ठाम निर्धाराने मराठा आरक्षण चळवळीला नवी दिशा दिली. त्यांनी मराठा आरक्षण चळवळ उभी करताना स्वतंत्र कोटा नको, तर मराठ्यांना थेट ओबीसी कोट्यात घ्या असा मार्ग सुचवला. या नव्या दृष्टिकोनामुळे आंदोलनाला उभारी मिळाली आणि महाराष्ट्राच्या जातीय राजकारणात जोरदार हालचाल झाली. मोर्चे, धरणे, उपोषणे अशा मार्गाने समाजाने आपला संताप व्यक्त केला अखेर सरकारलाही 'सगे-सोयरे तरतूद' स्वीकारावी लागली. या टप्प्याने मराठा समाजाचा असंतोष अधिक ठळक झाला आणि राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आला.

दोन वर्षात आंदोलन अनेक टप्प्यात गेले, राज्यभर झाले आणि सरकारवर दबाव वाढला. मराठा-कुणबी ओळख वाद उफाळून 'कुणबी जात समावेश' हा मुद्दा पुढे आला. एकीकडे सरकार निर्णय घेण्याचा प्रयत्न करत होतं तर दुसरीकडे ओबीसी समाजामध्ये असंतोष पसरला. मराठा आरक्षणावरील राजकीय वाद उग्र झाले, जरांगे-पाटील फॅक्टर हा क्षणिक उठाव आहे की दीर्घकालीन बदल हा आता खरा प्रश्न आहे. मनोज जरांगे यांनी २०२३ मध्ये मराठा आरक्षणासाठी दिलेला एल्गार हे मोठं वळण ठरलं. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावचे हे शेतकरी नेते अल्पावधीतच राज्यभर प्रसिद्ध झाले. त्यांनी मराठ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देऊन ओबीसीत समाविष्ट करा, अशी मागणी केली. त्यांच्या मते स्वतंत्र कोटा देण्याचा निर्णय न्यायालयात टिकणार नाही. त्यामुळे ओबीसी कोटा मागणी हा त्यांचा मुख्य मुद्दा ठरला. मराठा समाजाला ग्रामीण व आर्थिक परिस्थितीमुळे मागास असल्याचं दाखवत त्यांनी सरकारवर दबाव आणला. अहवालानुसार राज्यात २८ टक्के लोकसंख्या मराठ्यांची असून त्यातील सुमारे २१ टक्के कुटुंब दारिद्र्यरेषेखाली आहेत. त्यामुळे प्रत्येक मराठा हा कुणबीच, असा त्यांचा दावा अधिक ठळक झाला. या भूमिकेमुळे आंदोलनाची दिशा बदलली.

२०१६च्या विराट मूक मोर्चातून आलेली चळवळ २०१८ मध्ये १६ टक्के आरक्षण कायद्यापर्यंत पोहोचली पण २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणावरील कायदेशीर आव्हाने कायदा रद्द केला. त्यामुळे २०२३ मध्ये जरांगे यांनी पुन्हा धुरा हाती घेतली आणि थेट ओबीसी आरक्षणाची मागणी करून आंदोलनाला धार दिली. जरांगे-पाटील फॅक्टर मराठा तरुणांना भावला.जालना, बीड, नांदेड, धाराशिव या मराठवाड्यातील शहरात आंदोलन पेटलं, रास्ता रोको झाले आणि राज्य सरकारला अनेक वेळा कठीण परिस्थितीतून जावं लागलं. मनोज जरांगे यांनी ऑगस्ट-सप्टेंबर २०२३ मध्ये अंतरवाली सराटी येथे पहिले आमरण उपोषण केले. त्यानंतर वेळोवेळी त्यांचा उपोषणांचा सिलसिला सुरूच राहिला. २५ जानेवारी २०२५ रोजी त्यांनी सातवे आमरण उपोषण केले. २७ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांनी 'शेवटचा एल्गार' पुकारला. मुंबईतील आझाद मैदानावर तिस-या दिवशीही त्यांचे उपोषण सुरू होते. आधी त्यांना एक दिवसाचीच परवानगी देण्यात आली होती. त्यात आता वाढीव दोन दिवसांची भर पडली आहे. आपली मागणी पूर्ण होईपर्यंत मुंबई सोडणार नाही असा त्यांचा निर्धार आहे. यावरून हे स्पष्ट होते की, जरांगे-पाटील फॅक्टर अंतर्गत त्यांची चळवळ सतत उभारी घेत गेली आहे. या आंदोलनाने वेळोवेळी सरकारला निर्णय घेणे भाग पाडले आहे.

या एकूण संघर्षात जरांगे पाटील फॅक्टरची ताकद आणि परिणामकारकता अधोरेखित झाली आहे. या आंदोलनाची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणजे सरकारने केलेली तथाकथित 'सगे-सोयरे तरतूद' मराठा समाजातील ज्या व्यक्तींच्या पूर्वजांची नोंद कुणबी जात म्हणून आढळते. त्यांच्या सगे-सोय-यांनाही (रक्त व लग्नसंबंधातून जोडलेले नातेवाईक) कुणबी प्रमाणपत्र देता यावे, यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे अनेक मराठा कुटुंबांना थेट ओबीसी प्रवर्गातील आरक्षणाचा मार्ग खुला झाला आहे. सरकारने स्पष्ट केले की, अर्जदाराने शपथपत्र व पुरावा दिल्यास त्याच्या सर्व नातलगांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळेल. सगे सोयरे तरतुदीला ओबीसी संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. सध्या भगवे वादळ मुंबईत धडकल्याने मैदानासमोरच्या सीएसएमटी स्थानकात आंदोलकांची प्रचंड गर्दी झाली. कुलाबा ते दादरपर्यंत संपूर्ण वाहतूक कोलमडून पडली. मराठा आंदोलक यावेळी महिनाभर मुक्कामाच्या तयारीने आले आहेत. सीएसएमटी परिसरातील औषधाची दुकाने, हॉटेल मुद्दाम बंद करण्यात आली. सरकारने छळ करण्यासाठी हा प्रकार केल्याचा आरोप होत आहे. आंदोलकांनी टेम्पोमध्ये अन्न, भाजीपाला, गॅस सिलिंडर आणले असून त्यांनी सर्वांसाठी फूटपाथवर स्वयंपाक सुरू केला. टेम्पोत झोपण्याचीही व्यवस्था आहे. आता तर थेट गावच्या भाकरी मुंबईत पोहोचल्या आहेत. जेवढे वाटले होते तेवढे हे आंदोलन सरकारला सोपे जाणार नाही. आंदोलनात फूट पडण्याची चिन्हे नाहीत ना जरांगे पाटील झुकणार नाहीत. त्यामुळे हा जरांगे फॅक्टर सरकारला घाम फोडताना दिसतो आहे.

## लिंबागणेशचे श्रीकृष्ण कानिटकर यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील लिंबागणेश येथील जेष्ठ नागरिक व माजी ग्रामपंचायत सदस्य,शेतीनिष्ठ शेतकरी श्रीकृष्ण मोरेश्वरराव कानिटकर वय ७७ यांचे रविवारी दुपारी ३.२० वाजता संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले.**

कृष्णा बाबा या नावाने गावात परिचीत असलेले कानिटकर यांचा धार्मिक, सामाजीक कार्यात मोठा सहभाग होता. गावात पाणीटंचाई असतांना त्यांनी स्वत:च्या शेतातील पीकाची पर्वा न करता गावातील लोकांना मोफत पाणी देवुन त्यांची तहान भागवली. येथील ग्रामपंचायतीवर अनेकवेळा ते सदस्य म्हणून निवडून गेले होते. वृध्दापकाळाने मागील सहा दिवसांपासून संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. उपचार सुरू असतांना रविवारी दुपारी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर रविवारी रात्री साडेआठ वाजता वाजता गावातील भालचंद्र मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याजवळील स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुली, जावई ,एक मुलगा असा परिवार आहे.

## परळी अत्याचार प्रकरणी ना.पंकजा मुंडेंचा एसपींना फोन

**बीड । प्रतिनिधी**

**परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी चिमुरडीवर झालेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपींविरुद्ध कडक कारवाई करावी असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज बीडच्या एसपींना दिले.अशा प्रकारचे घृणास्पद कृत्य करणारा नराधम कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नये, अशी शिक्षा त्याला झाली पाहिजे असंही त्यांनी सांगितलं.**

रेल्वे स्थानक परिसरात बाहेरगावाहून आलेल्या एका दाम्पत्याच्या पाच वर्षाच्या बालिकेवर शनिवारी एका नराधमाने बलात्कार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, या घटनेबाबत ना. पंकजाताई मुंडे यांनी बीडचे एसपी नवनीत कॉवत यांना फोन करून सर्व माहिती घेतली. हा प्रकार अतिशय घृणास्पद आणि संतापजनक आहे, आरोपी कुठल्याही परिस्थितीत सुटता कामा नये, अशी केस तयार करून त्याला कडक शिक्षा करा असे निर्देश त्यांनी दिले. पिडित चिमुरडीवर सध्या अंबाजोगाईच्या शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. ना. पंकजाताई मुंडे यांनी रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ धपाटे यांनाही फोन करून चिमुरडीच्या तब्येतीची विचारपूस केली आणि तिच्यावर योग्य ते सर्व उपचार करण्यास सांगितले.

पान ६ वरून...

### सेवा पंधरवडा : जनतेच्या समस्या

अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे . कारण पाणंद रस्त्यांची समस्या वर्षानुवर्षे शेतकरी अनुभवत आहेत . शेतमाल बाजारात पोचवण्यासाठी रस्त्यांची सुविधा हा शेतकऱ्यांचा मुलभूत अधिकार आहे . घर आणि जमिनीवरील हक्क ही तर प्रत्येक नागरिकाची गरज आहे . शासनाने या उपक्रमातून त्या समस्या दूर करण्याचे वचन दिले आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अधीक्षक भूमी अभिलेख तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या प्रयत्नातून नागरिकांच्या तक्रारी व अडचणी तातडीने सोडवण्याचे काम सुरू आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही पुढाकार घेऊन वादग्रस्त रस्ते मोकळे करणे , सस्ती अदालतांचे आयोजन करणे आणि नागरिकांना प्रत्यक्ष न्याय देणे अशा अनेक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवला आहे. मागील शासन निर्णयांचा संदर्भ घेतल्यास , ग्रामविकास विभागाचा दिनांक १६.०२.२०१८ चा निर्णय , नगरविकास विभागाचा दिनांक ११.०९.२०१८ चा निर्णय , तसेच महसूल विभागाचे १९९६ पासूनचे विविध निर्णय हे सर्व या उपक्रमाशी जोडले गेले आहेत . म्हणजेच, हा उपक्रम केवळ औपचारिक नसून, आधीच्या निर्णयांना नवा गतीमान वेग देणारा आहे . रस्ता मिळाला, तर पिके बाजारात पोहोचतील , घर मिळालं, तर संसार उजळून निघेल, हक्क मिळाला, तर न्याय अनुभवता येईल , सेवा पंधरवडा जनतेचा दीप उजळवेल ! या उपक्रमात स्थानिक लोकप्रतिनिधी, पंचायत समिती , ग्रामपंचायत सदस्य , शेतकरी, नागरिक सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. म्हणूनच सेवा पंधरवडा हा केवळ उपक्रम नाही , तर तो जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाचा संकल्प आहे . छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या माध्यमातून सुरू झालेला हा लोकाभिमुख प्रवास राज्यातील शेतकरी व नागरिकांसाठी नवा आशेचा किरण ठरेल यात शंका नाही .

## गणेशोत्सव निमित्त लिंबागणेश येथे पोलिसांचे पथसंचलन



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील सुप्रसिद्ध श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या पावनभूमीत मयुरेश्वर गणरायाची प्रतिष्ठापना सरकार वाड्यात मोठ्या श्रद्धाउत्साहात करण्यात आली.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत व सहाय्यक पोलीस अधीक्षक (उपविभाग केज) ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नेकनुर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.१) सोमवार रोजी सायंकाळी लिंबागणेश येथे पथसंचलन पार पडले. पथसंचलनास सुरुवात पोलीस चौकी येथून होऊन बस स्थानक हनुमान चौक वाणी चौक ढवळे चौक सरकार वाडा असा मार्गक्रमण करत पुन्हा पोलीस चौकी येथे सांगता झाली. या पथसंचलनात पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब रोकडे, पद्माकर आहेर, सपो. लक्ष्मण बीडकर, बाबासाहेब राख, गोविंद बडे, पोह. विशाल क्षीरसागर, अविनाश घुंगरट, सतिश राऊत, खाडे, बाळासाहेब ढाकणे, खाडे यांच्यासह एकूण ३० पोलीस कर्मचारी व ३० होमगार्ड सहभागी झाले होते. गणेशोत्सव काळात मूर्ती प्रतिष्ठापनेपासून ते गणेश विसर्जनापर्यंत कडकडीत बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले.

## ट्रॅव्हल्समधील प्रवाशाने जाळून घेऊन संपली जीवन यात्रा

**जालना । प्रतिनिधी**

**ट्रॅव्हल्समधील एका प्रवाशाने स्वत:च्या अंगावर डिझेल ओतुन जाळून घेतले यामध्ये त्या व्यक्तीचा जागेवरच मृत्यू झाला या घटनेने एकच खळबळ उघडली सदरील घटना बदनापुरजवळील निरंकारी पेट्रोल पंपासमोर घडली. पोलिसांनी या घटनेची नोंद घेतली असलीतरी या प्रवाशाने असे टोकाचे पाऊल का उचलले, हे समजु शकले नाही.**

यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, पुसदकडे जाणारी ट्रॅव्हल्स (एमपी ०९-डीपी ९९२५) ही (ता. ३१) सकाळी ५.३० वाजेच्या सुमारास जालना छत्रपती संभाजीनगर महामार्गावर निरंकारी पेट्रोल पंपासमोर थांबली असता सिट क्रमांक १२ वर बसलेले सुनिल सज्जनराव टाले (वय ५०, रा. आरेगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा) यांनी स्वतःच्या अंगावर डिजेल ओतुन घेत आपली जीवन यात्रा संपली या घटनेमुळे ट्रॅव्हल्समध्ये आरडाओरड सुरु झाली. यावेळी काही प्रवाशांनी श्री. टाले यांना लागलेली आग पाणी टाकुन विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत ते पूर्ण जळाले होते.



अखेर त्यांना गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी ट्रॅव्हल्सचा चालक सुनिल धोंडवा इंगोले (वय ४०, रा. मोखाड, ता. पुसद) याने दिलेल्या माहितीवरुन बदनापुर पोलिसांनी या खळबळजनक घटनेची नोंद घेतली आहे. परंतु सदरील घटना घातपात असल्याचे बोलल्या जात आहे.

पान १ वरून...

### नमो शेतकरी महा सन्मान योजनेत

आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी अनोळखी लिंक्स ओपन करू नयेत, तसेच मोबाईलवरून कोणालाही ओटीपी शेयर करू नये, असा सल्ला जाणकार देत आहेत. दरम्यान, नमोचा ७ वा हप्ता बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर वितरीत करण्यात येईल, अशी अपेक्षा होती. परंतु राज्य सरकारने त्यावर पाणी फेरलं. वास्तविक पीएम किसानच्या हप्त्यानंतर १० दिवसांच्या आता नमोचा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होणं, अपेक्षित असतं. मात्र प्रत्येक हप्त्याच्या वितरणात राज्य सरकारकडून तारखांचा घोळ घातला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. आता सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नमोचा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. परंतु याबद्दल अद्यापही अधिकृत घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली नाही. त्यामुळे नमोच्या सातव्या हप्त्याची प्रतिक्षा कायम आहे. दुसरीकडे पीएम किसानच्या विसाव्या हप्त्यासाठी राज्यातील ९२ लाख ८१ हजार शेतकरी पात्र ठरली. त्यानुसार राज्यातील शेतकरी नमोच्या सातव्या हप्त्यासाठी पात्र असून त्यामध्ये मागील हप्त्याच्या लाभापासून वंचित राहिलेल्या ४ लाख शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून १ हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद अपेक्षित आहे.

---------------

### मराठा कुणबीच्या सर्वात

एक लाख ४३ हजार ४७३ एवढे सर्वाधिक आहे.कोकण महसूल विभागात सर्वांत कमी ८० हजार ७८१ जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तेथे आठ लाख २५ हजार २४७ कुणबी नोंदी सापडल्या आहेत. बीड जिल्ह्यामध्ये तब्बल एक लाख ६३ हजार १२३ जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यामध्ये दोन हजार २०९ जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहेत. शिंदे समितीच्या या अहवालानुसार जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा नाशिक विभागाला व सर्वात कमी फायदा हा मराठवाड्याला झाल्याचे दिसते.दरम्यान मराठवाड्यातील मराठा कुणबी प्रश्नाचा स्वतंत्र विचार करता येईल का याबाबत मराठा उपसमितीच्या बैठकीत चाचपणी झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. त्यात आता मराठा आरक्षणासाठी मराठवाडा गॅझेटियर (१९६७) हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. तत्काली मराठवाड्याची तपशीलवार माहिती त्यात देण्यात आली आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय स्थितीची माहिती या गॅझेटियमध्ये आहे.

--------------

### मुंबई उद्या दुपारपर्यंत रिकामी करा

सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत उच्च न्यायालयात जोरदार खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं. आंदोलन हाताबाहेर गेल्याचं निरिक्षण उच्च न्यायालयाने सांगितले. तसेच सदर याचिकेवर उद्या (२ सप्टेंबर) दुपारी ३ वाजता उच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार आहे. उद्या आदेशाच पालन झालं की नाही ते राज्य सरकारला न्यायालयात सांगाव लागणार आहे. तसेच सीएसएमटी, मरीन ड्राईव्ह, फ्लोरा फाउंटेन आणि दक्षिण मुंबईतील इतर परिसरातून आंदोलकांना हटवण्याचे उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश दिले आहेत

--------------

### परळीतील अल्पवयीन मुलीवर

दरम्यान रेल्वे स्टेशन परळी येथे एक आरोपी नराधम याने पिडीत बालक वय वर्ष ०६ हीस रेल्वे स्टेशन वरील रेल्वे रुळाजवळील उड्डानपुलाकडे घेवुन जाऊन तिचेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. लैंगिक अत्याचार करुन आरोपी फरार झाला होता. सदर घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वरीष्ठांना माहिती दिली. त्यावरून सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रवाना केले. सहाय्यक पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, पोलीस स्टेशन संभाजीनगर, स्था.गु.शा., पिंक पथक अंबाजोगाई यांनी अथक परिश्रम करून घटना घडल्यानंतर सर्व तांत्रीक बाबी तपासून ०५ तासांच्या आत आरोपी निष्पन्न करुन आरोपीस तात्काळ अटक केली आहे. आरोपीविरुद्ध संभाजीनगर पोलीस स्टेशन, परळी येथे गुरन १८२/२०२५ कलम १३७ (२), १४० (४), ६४ (२) (),६४(२) (),६५ (२) , सह कलम ४,६,८,१२ पोक्सो ॲक्ट २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक आरोपीस मा. विशेष न्यायालय, अंबाजोगई येथे हजर केले असता आरोपीस मा. न्यायालयाने आरोपीस ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, धनंजय ढोणे, रघुनाथ नाचण, सपोनि संतोष जाधवर, पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे, महेश विघ्ने, स.फौ. सोडगीर, नागरगोजे, पोह. पठाण, आवले, महेश जोगदंड, परशुराम केकान, विष्णु सानप, पोना. गेविंद भताने, पो.अं. उत्तरेश्वर केदार, चव्हाण, बप्पासाहेब देशमुख, सचिन आंधळे, चालक महादेव मुंडे यांनी केली आहे.

-----------

### मराठा आंदोलकांसमोर मुंबई मनपा हतबल

भयानक रूप धारण केले आहे. मुंबई महापालिकेने आंदोलन स्थळ, आझाद मैदान, सीएसटी परिसरात स्वच्छतेसाठी तीन शिफ्टमध्ये सुमारे १२०० कर्मचारी फिल्डवर उतरवले आहेत. ही स्वच्छता करताना महापालिकेची चांगलीच दमछाक होताना दिसत आहे. अशा या आंदोलनाला महापालिका पहिल्यांदाच सामोरे जात आहे. आम्ही स्वच्छता करताना हतबल ठरत आहोत, अशी एका अधिका-याने प्रतिक्रिया दिली.गेल्या ३दिवसांत महापालिकेच्या स्वच्छता विभागाने २२ मेट्रिक टन कचरा उचलला आहे. आंदोलनादरम्यान, सुमारे ३० मेट्रिक टनापेक्षा अधिक कचरा निघण्याची शक्यता अधिका-यांनी वर्तवली. या साफसफाईसाठी ३ दिवसांपासून ३ शिफ्टमध्ये १२०० कर्मचारी फिल्डवर उतरवले आहेत. कर्मचा-यांच्या गणेशोत्सवातील सुट्ट्या रद्द करून फिल्डवर उतरवण्यात आले आहे.वाहतूक सुरळीत करताना वाहतूक पोलिसांचीही चांगलीच दमछाक होत आहे. लाखो आंदोलकांची हजारो वाहने एकाचवेळी मुंबईत धडकल्याने वाहतूक व्यवस्थेची पहिल्याच फटक्यात विकेट पडली. इतक्या मोठ्या प्रमाणात आंदोलक आणि वाहने शहरात धडकू शकतात, याचा अंदाज सरकारला नव्हता. त्यामुळे २९ ऑगस्टलाच वाहतुकीचे १२ वाजले होते.त्यादिवशी हाताबाहेर गेलेली परिस्थिती अजूनपर्यंत नियंत्रणात आलेली नाही. आझाद मैदान, सीएसएमटी, बीएमसी, चर्चगेट, मंत्रालय या भागात मोठ्या प्रमाणात आंदोलक रस्त्यावर उतरल्याने मोठी वाहतूक कोंडी आहे. मुंबईच्या एन्ट्री पॉईंट्सवरही वाहतूक कोंडी कायम आहे. मुंबईतील वाहतूक कोंडीची धास्ती घेऊन आतापर्यंत ८० हजार वाहनांनी यु-टर्न घेतला आहे.

-----------

### ओबीसींवर अन्याय झाला तर लाखोंच्या

फडणवीस कोणीही ओबीसीमध्ये एससीमध्ये एसटीमध्ये नवीन जात टाकू शकत नाही असे भुजबळ म्हणाले. आमच्यावर अन्याय झाला तर लाखोंच्या संख्येने मुंबईत येणार असल्याचे भुजबळ म्हणाले. आज सर्व ओबीसी नेत्याची बैठक झाली या बैठकीला लक्ष्मण हाके सह अन्य नेते उपस्थित होते या नंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना भुजबळ म्हणाले कि आज मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना भेटलो आहे. गॅजेट्स सगळे दफ्तर आहे. कोटा ओलांडला तर आम्ही दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर राहणार असल्याचे भुजबळ म्हणाले. केंद्र सरकारने एक कायदा बनविला आहे. जे ओबीसी किंवा दलित, आदिवासीमध्ये बसत नाहीत पण आर्थिक मागास आहे. पण सामाजिक दृष्ट्या आरक्षण लागू झाले आहे. त्यात १० टक्के आहे, इतर ८ टक्के उमेदवार मराठा समाजाचे आहेत हे सरकारने जाहीर केल्याचे भुजबळ म्हणाले. ब्राम्हण सुद्धा शेतकरीआहेत. मारवाडी देखील शेतकरी आहेत, मग ते कुणबी आहेत का असे भुजबळ म्हणाले. २७ टक्क्यामधील १७ टक्के शिल्लक आहे. या १७ टक्क्यांमध्ये ३७४ जाती आहेत. तुम्ही आमच्यामध्ये आणखी कोणी टाकू नका मी ओबीसीचा नेता म्हणूनच इथे बसलो आहे. मंत्रीमंडळात सुद्धा ओबीसीचा नेता म्हणूनच बसलो असल्याचे भुजबळ म्हणाले. आम्ही जिल्ह्यात उपोषण करु, यात्रा काढू, मुंबईत लाखोंच्या संख्येनेमोर्चा काढू असा इशारा देखील भुजबळ यांनी दिला आहे. आमदारांनी मागणी केली म्हणजे कायदा होत नाही. उद्या कुणीही काहीही मागणी केली तर होत नाही असे भुजबळ म्हणाले. अधिवेशनात ठराव केला तरी होत नाही, नियमाचा रस्ता आहे, त्यानुसार जावे लागेल असे भुजबल म्हणाले. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यांनी ओबीसीला धक्का लावणार नाही असे सांगितल्याचे भुजबळ म्हणाले.

-------------

### अंतरवाली सराटीमध्ये

यांच्या आंदोलनाचा चौथा दिवस आहे. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण द्या, ही जरांगे पाटील यांची मुख्य मागणी आहे. या विरोधात ओबीसी समाज अंतरवाली सराटी गावात आंदोलनाला बसला आहे. यावेळी त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत मात्र, मनोज जरांगे पाटील यांची दादागिरी थांबवा, ते समाजात तेढ निर्माण करत आहेत, असा आरोप करण्यात आला.मनोज जरांगे पाटील शिवद्रोही असल्याचाही आरोप ओबीसी आंदोलकांनी केला. ओबीसीमधील त्यांची घुसखोरी थांबवण्यासाठी हे आंदोलन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सरकार ज्या ५४-५८ लाख नोंदी सापडल्याचा दावा करत आहे त्याचे पुरवे त्यांनी जनतेसमोर जाहीर करावेत, अशी मागणीही ओबीसी आंदोलकांनी अंतरवाली सराटीमध्ये केली. तसेच जरांगे पाटील यांच्या झुंडशाहीसमोर दबून उपसमितीने कुठलीही मागणी मान्य करू नये, अशी आग्रही मागणीही ओबीसी आंदोलकांनी केली.

-------------

### कायद्याच्या चौकटीत मराठा ओबीसी वाद

घेण्यापूर्वी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला होता त्यामुळे तेथील आरक्षण ५० टक्के च्या पुढे टिकले गेले मात्र आता न्यायालयाच्या निर्णयानंतर आरक्षणाची टक्केवारी वाढवणे हा न्यायालयाचा अवमान होईल असे सरकारचे म्हणणे आहे २००१ मध्ये बाळासाहेब रंगनाथ चव्हाण यांना जात पडताळणी समितीने कुणबी प्रमाणपत्र दिले होते त्यावर जगन्नाथ होले यांनी तक्रार दाखल केली मात्र दाद न मिळाल्याने जगन्नाथ होले हे मुंबई उच्च न्यायालयात गेले होते त्यात महाराष्ट्र शासनाने बाळासाहेब रंगनाथ चव्हाण यांना प्रतिवादी केले होते १७ ऑक्टोबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने न्यायमूर्ती डी एच मारलापल्ले आणि न्यायमूर्ती यश बग्गा यांनी निकाल दिला या आदेशातील परिच्छेद १७ मध्ये म्हटले आहे की या प्रकरणात सादर प्रमाणपत्र मान्य केले तर महाराष्ट्रात संपूर्ण मराठा समाज हा कुणबी म्हणून स्वीकारावा लागेल आणि असे झाले तर तो सामाजिक मूर्खपणा ( सोशल अबसडीटी ) ठरेल, उच्च न्यायालयाच्या या निकाला विरोधात बाळासाहेब चव्हाण हे सुप्रीम कोर्टात गेले आणि तेथे त्यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान दिले सुप्रीम कोर्टात न्यायमूर्ती वियन अग्रवाल आणि न्यायमूर्ती बालसुब्रह्मण्यम यांच्या खंडपीठाने १५ एप्रिल २००५ रोजी निकाल दिला त्यात सांगितले की मुंबई हायकोर्टाचा निर्णय योग्य आहे त्यात हस्तक्षेप करण्याची आम्हाला काहीच गरज नाही त्यामुळे आम्ही ही याचिका खारीज करत आहोत असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले यासोबतच दुसऱ्या एका प्रकरणांमध्ये आणखी एक प्रकरण उच्च न्यायालयात गेले ते होते सुहास दशरथे विरुद्ध महाराष्ट्र सरकार यावर चा निकाल आला सहा ऑक्टोबर २००२ रोजी खंडपीठातील न्यायमूर्ती मारलापल्ले आणि न्यायमूर्ती एन व्ही दाभोळकर यांच्या निकालातील परिच्छेद क्रमांक ४६ म्हणतो की जात पडताळणी समितीकडे जी भूमिका मांडण्यात आली ती स्वीकारण्यात आली तर मराठा समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र द्यावी लागेल आणि असे केले तर ते महाराष्ट्रातील वास्तविक सामाजिक व्यवस्थेच्या विरोधात असेल त्यामुळे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशाप्रमाणे किंवा निकालाप्रमाणे सरसकट कुणबी प्रमाणपत्र देता येत नाही आणि हीच मोठी अडचण सरकारपुढे निर्माण झालेली आहे सरकारच्या मनात जरी इच्छा असेल तर न्यायालयाच्या निर्णयाकडे देखील पहावे लागणार आहे ,देव बाप्पा आपण बुद्धीदेवता आहात आपण यातून मार्ग काढू शकता ज्याप्रमाणे मराठा समाजाला दिलेले दहा टक्के आरक्षण कोर्टात टिकले आणि ती त्याचप्रमाणे यातही मार्ग काढून न्याय दिला पाहिजे मात्र देवबाप्पा यातही दुसरी मेक अशी आहे जर ओबीसी मधून आरक्षण दिले गेले तर पुन्हा ओबीसी विरुद्ध मराठा असा वैचारिक वाद महाराष्ट्रात निर्माण होऊ शकेल त्यामुळे या दोन्ही मधून पर्याय निघावा हीच गणराया चरणी अपेक्षा, सद्यस्थितीमध्ये सरकार विरुद्ध आंदोलकाचा रोष अधिक आहे त्यासोबतच विरोधकावर देखील आहेच कारण विरोधक ठोस अशी भूमिका घेत नाहीत दोघांच्याही बोटचेपी भूमिका आहेत आपण काही निर्णय घेतला तर आपली वोट बँक कमी होईल का ही भीती आहे अशातच आंदोलनाला प्रति आंदोलनाचे उत्तर देण्याच्या तयारीत ओबीसी समाजाचे नेते असल्याचे दिसत आहे त्यामुळे गणपती बाप्पा तुम्हाला वेगळे सांगण्याचे गरज न्याय मिळाला पाहिजे सामाजिक सलोखा टिकला पाहिजे ही जबाबदारी तुमची आता बस्स एवढेच उद्या भेटू नव्या विषयासह

---------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०२ सप्टेंबर २०२५




## थोडक्यात...



### पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात ज्येष्ठा गौरी उत्सव साजरा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

घराघरात पारंपारिक पुजा-अर्चा करीत रविवार दि.३१ रोजी प्रेमपूर्वक ज्येष्ठा गौरींचे मोठ्या उत्साहात आगमन झाले आहे.गौराईचे मखर व समोरील आकर्षक सजावटी हे ज्येष्ठा गौराईचे मुख्य आकर्षण असते.गौराई समोर विविध खेळणी,विद्युत रोषणाई तसेच लाडू,करंज्या,अनारसे अन्य फराळाच्या पदार्थांचा समावेश असतो.सोमवार दि.१ सप्टेंबर २०२५ रोजी घरोघरी पूजन करून पुरणपोळीचे जेवण देऊन ज्येष्ठा गौरीचे पूजन करण्यात आले.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी,अंमळनेर, कोतन तसेच खोपटी सह परिसरात जेष्ठा गौरी तीन दिवसीय उत्सव सोहळा मोठ्या मंगलमय वातावरणात साजरा केला जातो.आज मंगळवार (दि.२) रोजी रात्री ९:५१ वाजेपर्यंत ज्येष्ठा गौरी विसर्जन केले जाणार आहे

### विविध सामाजिक उपक्रमांनी हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस साजरा होणार

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांचा आज ३१ ऑगस्ट २०२५ रोजी ५७ वा वाढदिवस साजरा होत असुन बीड तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने बॅनर, होर्डिंग, जाहिरातीवरील खर्चाला फाटा देत बीड तालुक्यातील निराधार, अनाथ, आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंब व पाल्यांना मदत त्याचबरोबर रक्तदान शिबिर, महाभिषेक, फलवाटप, शालेय साहित्य वाटप यासारख्या विविध सामाजिक उपक्रमांनी तालुकाभरात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिली.

### सय्यद वसीम सेट परीक्षा उत्तीर्ण

**वडवणी । प्रतिनिधी**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागाने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेतलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचा निकाल शनिवारी जाहीर केला. महाराष्ट्र आणि गोव्यातील एकूण १ लाख १० हजार ४१२ विद्यार्थ्यांनी सेट परीक्षेसाठी अर्ज केला होता. त्यातील ९० हजार ३६६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सेट परीक्षेत एकूण ६.६९टक्के म्हणजेच केवळ ६ हजार ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.त्यामधे वडवणी तालुक्यातील छोट्याशा गावातून सय्यद वसीम कादर यांनी आर्थिक परिस्थिति बिकट असताना अथक परिश्रम घेऊन स्वताच्या हिमतीवर यश संपादन केले.त्यांचे वडवणी तालुक्यातुन अभिनंदन व कौतुक होत आहे. पुणे विद्यापीठातील सेट परीक्षा विभाग हा महाराष्ट्र शासनाची नोडल एजन्सी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्याकरिता प्राधिकृत विभाग आहे. सेट परीक्षा विभागातर्फे १५ जून रोजी ४० व्या सेट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र आणि गोव्यातील १८ शहरांमधील २५६ महाविद्यालयांमध्ये ही परीक्षा घेण्यात आली.वडवणी तालुक्यातील देवडी येथील सय्यद वसीम कादर यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे मार्फत १५ जून २०२५ ला घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य योग्यता (च-डएढ) परीक्षेत त्यांना राज्यशास्त्र या विषयासाठी यश मिळाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जि.प. शाळा देवडी येथे झाले, पदवीतर शिक्षण बीड येथे पूर्ण करताना सेट परीक्षा उत्तीर्ण केली.

## प्रवीण जाधव यांच्या हस्ते श्रीं ची आरती

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरुर येथील सिंदफणा अर्बन बँकेमधे श्रीगणेशाची सायंकाळची आरती शिरूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरिक्षक श्री.प्रवीण जाधव यांच्या हस्ते व बँकेचे संस्थापक श्री.आजीनाथ गवळी यांच्या उपस्थितीमधे मोठया उत्साहात संपन्न झाली. यावेळी बँकेचे संस्थापक आजीनाथ गवळी यांचेसह गोमळवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री.अशोक खाकाळ,बँकेचे सचिव श्री.महादेव कातखडेसर,संपादक प्रकाश साळवे,रामनाथ जाधवसर,प्रकाश काशिद,अर्जुन भोसले,डिगांबर तावरे,व्यवस्थापक राम सुरे,कु.योगीता गवळी यांचेसह कॅशीअर ,क्लार्क आदी दिसत आहेत.

# नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत गिळंकृत भूगर्भातील पाणी संपत्ती संकटात!

**बीड । प्रतिनिधी**

**शहराच्या आजूबाजूचे नैसर्गिक नद्या-नाले ओढे जी भुगर्भातील पाण्याची पातळी वाढवणारे स्त्रोत आहेत ते स्त्रोत अदृश्य होत चाललेल्यामुळे जमिनीच्या भूगर्भातील पाण्याची पातळी कोसळत चालली आहे .आडातच नाही, तर पवऱ्यात काय येणार ?हा प्रश्न आता वास्तव ठरत चालला आहे. शहराच्या विकासाच्या नावाखाली नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत असलेले नद्या, नाले, ओढे आणि चाऱ्या या निर्दयपणे भूमाफियाकडून गिळंकृत होत आहेत आणि प्रशासन बघ्याची भूमिका निभावत आहे ज्या नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी टिकून होती, ती भुगर्भातील पाण्याची पातळी आता दिवसेंदिवस खाली खाली जात आहे.**



कधीकाळी ५० हजार लोकसंख्येच्या शहराला शहरातील पावसाचे पाणी आणि नागरिकांच्या निवास स्थानातील अंघोळ कपडे भांडी धुण्याचे घाण पाणी शहरा बाहेर जाण्यासाठी दहा फुटाची नाली होती तिचं नाली आज तीन लाख लोकसंख्येच्या ठिकाणी दोन फुटांची करुन ठेवली आहे ज्याचा परिणाम पावसाचे पाणी नद्या-नाल्यांकडे शिरण्या ऐवजी ते आता नागरिकांच्या घरा दारांनी आणि दुकानाने शिरवू लागल्याने नागरिकांची घरे पाण्यात तर भूगर्भातील जलसाठे रिकामे होत चालले आहेत. ज्या शहरात कधीकाळी २०-३० फुटावर सहज मिळणारे पाणी आता ३००-४०० फुटांवर खोदल्याशिवाय मिळत नाही.

## शहरातील वाढत्या सिमेंटकरणामुळे शहरात खोलवर पाणी मिळेना

आणि कधी कधी एवढ्या खोलवर गेल्यावर मिळण्याची शासवती नाही कारण भूगर्भातील पाणी परत भरणारे नैसर्गिक स्रोत आहेत ते आता भुमाफियांच्या आशिर्वादामुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षित पणामुळे नामशेष होत असून ती आता अस्तित्वातच नसल्या सारखी आहेत जमिनीच्या भुगर्भातील पाण्याची पातळी वाढवणारे स्रोतचे मार्ग बंद झाले असल्यामुळे येणाऱ्या काळात शहराला गावाला जिल्ह्याला दुष्काळाची झळ भोगावी लागेल आणि ती फक्त शेतकऱ्यांपुरती मर्यादित राहणार नाही, तर शहरातील प्रत्येक नागरिकाच्या दाराशी पोहोचेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.शहरातील जमिनीच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. या हव्यासापोटी भूमापनाच्या नावाखाली नद्या, नाले आणि ओढे गिळंकृत केले जात आहेत. प्रशासनही याकडे डोळेझाक करत असल्याने नैसर्गिक संतुलनाचा बोजवारा उडतो आहे.उद्याचा दुष्काळ टाळायचा असेल तरनद्या-नाल्यांवरील अतिक्रमण तात्काळ हटवानैसर्गिक पाण्याचे मार्ग मोकळे ठेवापावसाचे पाणी साठवणीसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे कराविकास आराखड्यात 'नैसर्गिक जलमार्ग संरक्षण' या घटकाला प्राधान्य द्या पाण्याची खरी बचत कागदोपत्री प्रकल्पांत नाही, तर नैसर्गिक स्रोत वाचवण्यात आहे. अन्यथा उद्याचा दुष्काळ प्रत्येकाला तहानलेले ठेवणार आहे!

## निगरगट्ट फडणवीस सरकारने आता मराठा समाजाचा अंत पाहू नये -ॲड. राज पाटील

**वडवणी । प्रतिनिधी**

**मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू केले. मराठा आरक्षण लढाई निर्णायक टप्प्यावर आलेली असताना निगरगट्ट राज्य सरकारने आता समाजाचा अंत पाहू नये, असा इशारा लढा दुष्काळाशी चळवळीचे प्रणेते तथा मराठा आंदोलक ॲड. राज पाटील यांनी दिला आहे.**



मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सुरवातीपासूनच सक्रिय असलेले ड. राज पाटील मुंबईत तळ ठोकून आहेत. मुंबईत लाखोंच्या संख्येने समाजबांधव एकवटले आहेत. ऊन वारा, पाऊस धारा याची कसलीही तमा न बाळगता आंदोलक मुंबईत ठाण मांडून आहेत. समाजाला आरक्षणाचा लाभ मिळावा,यासाठी हा लढा निर्णायक टप्प्यावर आलेला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकार कडून वेळकाढू धोरण अवलंबिले जात आहे. ही अतिशय चीड आणणारी बाब आहे. सरकारमधील काही मंत्री, आमदार मराठा आरक्षण बाबत अगदी बेताल वक्तव्य करून दिशाभूल करत आहेत. हे थांबविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संबंधिताना तंबी द्यावी, अशी मागणी ड. राज पाटील यांनी केली आहे.

**मंत्री चंद्रकात पाटील यांनी अकलेचे तारे तोडू नयेत: ॲड. राज पाटील**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आरपारची लढाई लढत असताना सरकारमधील भाजपाचे नेते, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देणे शक्य नाही, असे अकलेचे तारे तोडून समाजात असंतोष निर्माण केला आहे. या मंत्री महोदय यांनी आरक्षण बाबत अकलेचे तारे तोडू नयेत, असा सल्ला ड. राज पाटील यांनी दिला आहे.

## आ.सुरेश धस मित्र मंडळाच्या वतीने आ.अमित गोरखे यांचा सत्कार

पाटोदा । प्रतिनिधी

मातंग समाजाचे लोकप्रिय आमदार अमितजी गोरखे हे आमदार झाल्यानंतर प्रथमच आष्टी विधानसभा मतदारसंघात डोंगरकिन्ही आले असता त्यांचा मातंग समाज पाटोदा तालुका च्या वतीने व आ सुरेश आण्णा धस मित्र मंडळ पाटोदा तालुका वतीने डोंगरकिन्ही येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

मातंग समाज भूषण आमदार अमितजी गोरखे हे दि. ३० ऑगस्ट शनिवार रोजी आष्टी मतदार संघात डोंगरकिन्ही येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले असता आ सुरेश आण्णा मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले तर यावेळी



पाटोदा नगरपंचायत चे सभापती किशोर भाऊ आडागळे सत्कार व स्वागत केले यावेळी डोगरकिन्ही चे युवा नेते सुरेश वालेकर सरपंच गोवीद गाढे, युवा नेते दत्ताभाऊ साठे गणेश थोरात . ज्येष्ठ नेते लालासाहेब शिंदे संतोष रणसिंग. भोसले साहेब. गणेश रणदिवे निखिल अडागळे. दिनकर कांबळे. मोठ्या संख्येने समाज बांधव व कार्यकर्ते उपस्थित होते .

**सत्काराने आमदार गोरखे भारावले**

मातंग समाज भूषण आमदार अमित जी गोरखे सत्कार सोहळ्याने आपण भारावून गेलो असल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले.

## आंदोलकांची गैरसोय झाल्याने पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील नागरिकांनी भाकरी पाठवल्या मुंबईला

पिंपळवंडी । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी मुंबईत सुरू असलेल्या आंदोलनातील आंदोलनकर्त्यांच्या जेवणाची गैरसोय झाल्याचा प्रकार घडला.यानंतर पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी तसेच अंतर्गत वाडी-वस्तीतून ५० हजार भाकरी त्यासह ठेचा,चटणी, लोणचे व टिकणाऱ्या पदार्थांचे गाठोडे शनिवारी सायंकाळपर्यंत मुंबईत पाठवले.आज दि.१ सप्टेंबर सोमवार रोजी येथून भाकरी व पदार्थ पाठविण्यात येणार आहेत.आझाद मैदानावर २९ ऑगस्ट पासून मनोज जरांगे पाटील यांचे मराठा



आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू आहे.या आंदोलनासाठी राज्यभरातून मराठा बांधव मोठ्या संख्येने आझाद मैदानात दाखल होत आहेत.

५० हजार भाकरींचे संकलन पिंपळवंडीची ५ हजारावर लोकसंख्या आहे.तर आसपासच्या ७ वाड्यांनीही मोठा प्रतिसाद देत प्रत्येक घरातून २० ते ३० भाकरी आणि सोबत पदार्थ अशा ५० हजार भाकरींचे संकलन झाले होते.

**महिलांच्या मातृत्वाचे बळ**

आंदोलनासाठी पुरुष मंडळी ही मुंबईत गेली आहेत.त्यांना महिला वर्गाचे पाठबळ आहेच.मात्र जेवणाची गैरसोय हा मुद्दा महिलांसाठी काळजी वाहू ठरला.केवळ एका हाकेला प्रतिसाद देत महिलांनी काही वेळातच २० भाकरी तयार केल्या.याच महिलांच्या मातृत्वासह त्याग आणि बांधिलकीचे दर्शन घडले आहे.

## दिंद्रुडचे लिपीक श्रीकृष्ण कटारे यांचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

दिंद्रुड । प्रतिनिधी



संसाररुपी गाडा चालवताना प्रत्येकाला काही ना काही काम करावे लागते. मात्र आपले सर्व कर्तव्य निभावत माणसाच्या हातून प्रपंच करत असताना समाजसेवा देखील घडायला पाहिजे. असे मत जेष्ठ शिक्षक संजय बारवकर यांनी बोलताना व्यक्त केले. दिंद्रुड येथील जेष्ठ नागरिक तथा सहकार क्षेत्रात कार्यरत लिपीक श्रीकृष्ण एकनाथ कटारे यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमात ते काल शनिवारी (दि. ३०) बोलत होते.

माजलगाव सहकारी साखर कारखाना सुंदरनगर (तेलगाव) या ठिकाणी लिपिक पदावर असलेले श्रीकृष्ण कटारे यांची नियत वयोमानानुसार सेवानिवृती झाल्याबद्दल शिक्षकवृंद, समाजबांधव व ग्रामस्थांच्या वतीने त्यांना सपत्नीक सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक संजय बारवकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सहशिक्षक आदिनाथ चांदबोधले यांची उपस्थिती होती. यावेळी दिव्य मराठी चे पत्रकार नागेश वकरे, कार्यारंभ चे कटारे ज्ञानोबा सह आदिंची प्रमुख उपस्थिती होती. सहकार मध्ये नोकरी करत श्रीकृष्ण कटारे यांनी अनाथ, विधवा, वृद्धांना शासकीय पगारी लावणे, ग्रामपंचायत व इतर अनेक क्षेत्रातून लोकांची कामे केले असल्याचे प्रमुख पाहुणे आदिनाथ चांदबोधले यांनी सांगितले. यावेळी सहशिक्षक वचिष्ठ चव्हाण, संजय हंगरगे, ज्ञानेश्वर तांबे, सुमंत कटारे, शिंदे सर तेलंग सर व्यंकटी करे, नागेश वकरे, तेलंग, शिंदे आदिंनी आपापली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहशिक्षक मनोहर कटारे तर आभार हनुमंत कटारे यांनी व्यक्त केले.

## विजयकुमार कटारे सेट परीक्षा उत्तीर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जि. प. प्राथमिक शाळा पुनंदगाव येथे. कार्यरत शिक्षक विजयकुमार गुलाबराव कटारे हे शिक्षणशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.



विजयकुमार कटारे हे मूळचे वाघोरा गावचे आहेत. त्यांनी अत्यंत कष्टाने आपले शिक्षण पूर्ण केले आहे. मागीलअठरा वर्षापासून ते जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत.एक हाडाचा शिक्षक म्हणून त्यांची परिसरामध्ये ओळख आहे. त्यांच्या या यशाबद्दल माजलगावचे गट साधन गटशिक्षणाधिकारी महामुनी,केंद्रप्रमुख झोंबाडे,केंद्रीय मुख्याध्यापक काळे,शाळेचे मुख्याध्यापक गणगे यांच्यासह सर्व सहशिक्षक,मित्रपरिवार,कुटुंब व नातेवाईक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## युसूफवडगावकरांच्या वतीने अमोल जोगदंड व मनोज वैरागेचा सत्कार



**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील अमोल जोगदंड यांना नुकताच आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला तर मनोज वैरागेचा पवित्र पोर्टल प्रणाली मधुन माध्यमिक शिक्षक म्हणुन निवड झाल्याबद्दल लोककल्याण पतसंस्था व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

युसुफवडगांवचे भूमिपुत्र असलेले पण सध्या कोल्हापूर जिल्ह्यात जि.प प्राथमिक शिक्षक म्हणुन कार्यरत असलेले अमोल जोगदंड यांना त्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्य व योगदानाबद्दल नुकताच राजर्षी शाहु महाराज आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे तर मनोज वैरागे याचा नुकताच पवित्र पोर्टल प्रणाली मधुन श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी ता.उमरगा धाराशिव जिल्ह्यात माध्यमिक शिक्षक म्हणुन नियुक्त झाल्यामुळे या दोघांचा ही लोककल्याण पतसंस्था व गावकऱ्यांच्या वतीने शाल,श्रीफळ,फेटा व स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ.महादेव कोरसळे,सचिन जावळे,ओम चोपणे,पिंटु तळेकर,जयराम मांगडे,हनुमंत जाधव,अरूण राऊत, बापुराव चोपणे,बाबु शिंदे,जेजेराम शिंदे, जयपाल सुर्यवंशी,मयुर खंडेलवाल,गणेश रोडगे, जयराज निशिगंध,शाम रोडगे,सुरेश चोपणे,महेश चोपणे,अशोक वायकर,शिवकुमार कोरसळे, नितीन चोपणेसह गावकरी उपस्थित होते.

## लालाभाऊ कुम्कर यांची भाजपा बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील भाजपाचे ज्येष्ठ नेते लालाभाऊ कुमकर यांची भाजपाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड जाहीर केली आहे. आष्टी,पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा देऊन सत्कार केला. यामध्ये बीड जिल्ह्यातील भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी लालाभाऊ कुमकर यांचा उल्लेख केला जातो.त्यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समवेत अगदी सुरुवाती पासून भाजपाचे निष्ठेने काम केलं म्हणून लोकनेते पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्याशी कार्याची पोहोच पावती म्हणून त्यांना बीड भाजपा पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.या निवडीचा बीड जिल्ह्यासह आष्टी तालुक्यात फटाके फोडून अभिनंदन करण्यात आले.आष्टी, पाटोदा,शिरूर मतदार संघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी त्यांचा



पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.या निवडीचे भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी आपल्या स्वाक्षरीने उपरोक्त आदेश पारित केले आहेत. भाजपाने पुढील राजकीय गणिते विचारात घेऊन प्रत्येक तालुक्यामध्ये एक याप्रमाणे उपजिल्हाध्यक्ष निवड केलेली आहे. त्यामुळे आष्टी विधानसभा मतदार संघामध्ये लालाभाऊ कुमकर याची निवड करून सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी त्यांना पक्षाने दिलेली आहे. याबद्दल त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे, प्रितमताई मुंडे यांचे विशेष आभार मानून पक्षाने दिलेली जबाबदारी आपण यशस्वीरीत्या पेलणार असल्याचे सांगितले.बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचेही आभार यांनी मानले.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला मजबूत बनवण्याचे कार्य आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांच्या या निवडीने आष्टी, पाटोदा,शिरूर मतदार संघामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत असून सर्व स्तरातून त्यांच्या या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे.

## जय भगवान गणेश मंडळाचा अभिनव उपक्रम ; गणेशोत्सवात रक्तदान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नागरगोजे (येवलवाडी) येथे यंदाचा गणेशोत्सव केवळ उत्सवपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव जपणारा ठरला आहे. येथील जय भगवान गणेश मंडळाने प्रथमच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले व मन जिंकले गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित रक्तदान शिबिरामध्ये गावातील तसेच परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. समाजासाठी थेट उपयोगी ठरणाऱ्या या कार्यात तरुणाईने उत्साहाने रक्तदान करून आपले योगदान नोंदवले.




ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने डोळे तपासणी शिबिर घेण्यात आले. शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. अनेक ज्येष्ठ नागरिक व महिलांनी आपल्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवण्याची संधी साधली.तसेच गावातील महिला व विद्यार्थिनींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. रंगांच्या उधळणीने गावाचे वातावरण अधिकच आनंदमय झाले. सहभागी महिलांनी विविध सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्यांद्वारे आपली कला सादर केली.सामाजिक उपक्रमांमुळे गणेशोत्सव अधिक उपयुक्त ठरला असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. फक्त सांस्कृतिक कार्यक्रमांपुरता उत्सव न ठेवता समाजहिताचा संदेश देण्याचे कार्य जय भगवान गणेश मंडळाने गणेशोत्सवातून समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
मंगळवार दि. २ सप्टेंबर २०२५ ४

# महाराज असल्याचे सोंग करत केली गांजाची शेती, पोलिसांकडून एकास अटक

## छत्रपती संभाजीनगरमध्ये घडला प्रकार


छत्रपती संभाजीनगरात: महाराज असल्याचे सोंग घेत चक्क गांजाची शेती केल्याचा प्रकार उघड झाला आहे. पोलिसांना याची माहिती मिळताच पथकाने छापा टाकून मोठ्या प्रमाणात गांजा जप्त केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र, मुख्य संशयित 'गोट्या महाराज' उर्फ परमेश्वरानंद हा पसार झाला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. स्थानिक पोलिसांना माहिती मिळाली होती की, दुचाकीवरून गांजाची विक्री करण्यासाठी एक तरुण साताऱ्यात येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला आणि संशयिताला ताब्यात घेतलं. त्याच्याकडून जवळपास ३८५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. चौकशीत त्याने कबुली दिली की, हा माल तो 'परमेश्वरानंद महाराज' यांच्याकडून आणतो. या माहितीच्या आधारे पोलिसांनी गेवराई बुद्रुक परिसरातील डोंगर गाठला. तिथे पोहोचल्यावर पोलिसांना जनावरांच्या गोठ्यात ३० किलो गांजा सापडला. पोलिसांनी हा साठा जप्त करून गुन्हा



दाखल केला. मात्र पोलिसांचे पथक पोहोचण्यापूर्वीच संशयित 'गोट्या महाराज' पसार झाला.

परमेश्वरानंद उर्फ गोट्या महाराज हा डोंगर परिसरात वास्तव्यास असून, तिथे तो जनावरं पाळतो, सेंद्रिय खताची निर्मिती व विक्री करतो. मात्र याच कामाच्या आडोशाला तो गांजाची लागवड आणि विक्री करत असल्याचं उघड झालं. पोलिसांच्या कारवाईनंतर स्थानिकांमध्ये या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. या प्रकरणात अटक झालेल्या तरुणाची ओळख लहू बंडूबा मोरे (वय २५, रा. सिंदोर) अशी झाली आहे. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसारच मोठा साठा पोलिसांनी उघडकीस आणला. सध्या पसार झालेल्या 'गोट्या महाराजां'चा शोध घेण्यासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. पिंपरी चिंचवडमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिथे नात्यातील एका मुलीच्या २६ वर्षीय प्रियकराला ११ जणांनी केलेल्या बेदम मारहाणीत त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी ११ आरोपींविरुद्ध कट रचून खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी आतापर्यंत ९ जणांना पोलिसांनी अटक केली आहे.ही घटना २२ जुलै रोजी पिंपरीतील सांगवी परिसरात असलेल्या देवकर पार्कमधील एका खोलीत घडली. मृत तरुणाचे नाव रामेश्वर घेंगट असून, त्याचे त्याच्याच नात्यातील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते.

# रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन



खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते..

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर अ‍ॅझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादीवाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल.गादीवाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे. लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०- १०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

# गायींच्या या तीन जाती आहेत खुपच फायदेशीर, दररोज ५० लिटरहून अधिक दूध

सध्या भारतात दुग्ध व्यवसाय झपाट्याने विस्तारत आहे. दुधाच्या व्यवसायातून लोकांना महिन्याभरात लाखोंचा नफा मिळत आहे. हा व्यवसाय करण्यासाठी तंत्रज्ञान आणि ज्ञान देखील आवश्यक आहे. जर तुम्ही योग्य जनावरांपासून हा व्यवसाय सुरू केलात तरच तुम्हाला नफा मिळू शकेल, अन्यथा तुम्हाला त्यात इतका पैसा मिळू शकणार नाही.

गीर गाय :ही भारतातील सर्वाधिक दूध देणारी गाय आहे. या जातीच्या गायींचे कासे जास्त मोठे असतात. ही गाय गुजरातच्या गीर जंगलात आढळते. मात्र, आता भारतभर त्याची लागवड केली जात आहे. ही गाय दररोज सरासरी १२ ते २० लिटर दूध देते. मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ही गाय दररोज ५० ते ६० लिटर दूधही देऊ शकते असे दिसून आले आहे. तेव्हा विचार करा, अशा तीन ते चार गायी पाळल्या तर महिन्याभरात फक्त त्यांचे दूध विकून किती नफा कमावता येईल.

लाल सिंधी गाय :याच्या नावावरूनच ही लाल सिंधी गाय सिंध प्रांतात आढळते. त्याचबरोबर ही गाय थोडीशी लाल रंगाची असल्याने या गायीला लाल सिंधी गाय म्हणतात. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाबमध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ही गाय दररोज १५ ते २० लिटर दूध देते. मात्र, त्याची योग्य काळजी घेतल्यास ते दररोज ४० ते ५० लिटर दूध देऊ शकते.

साहिवाल गाय : उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हरियाणामध्ये तुम्हाला साहिवाल गाय अधिक आढळेल. या राज्यांतील शेतकऱ्यांमध्ये ही गाय सर्वाधिक लोकप्रिय आहे. ही गाय दररोज सरासरी १० ते १५ लिटर दूध देते, मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ती दररोज ३० ते ४० लिटर दूध देऊ शकते. या गायीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ती कमी जागेतही ठेवता येते आणि तिची जास्त काळजी घेण्याची गरज नसते.



# करटुल्याचे लागवड तंत्र

करटुले लागवडीसाठी योग्य जमीन व हवामान, लागवडीची वेळ, पेरणी, लागवड तंत्र, खते, पाणी व्यवस्थापन, परागीभवन व फळधारणा महत्वाची आहे.

लागवडीसाठी योग्य जमीन व हवामान :करटुले विविध प्रकारच्या जमिनीत उगवू शकते परंतु ५.५ ते ७.० सामू असलेली वालुकामय गाळाची जमीन यासाठी सर्वोत्कृष्ट ठरते. सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध आणि चांगली निचऱ्याची क्षमता असलेली जमीन लागवडीसाठी उपयुक्त आहे. तसेच उष्ण व दमट हवामान करटुले लागवडीसाठी पूरक ठरते. हे पीक २५३५ तापमानात व ६००४५०० मिमी वार्षिक पर्जन्यमानात उत्तम वाढते.

पेरणीची योग्य वेळ :करटुले पिकाचा कालावधी साधारणतः १२५ दिवसांचा असतो. सामान्यतः पावसाळ्याच्या सुरुवातीस पेरणी केली जाते. विक्री योग्य फळे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात तयार होतात. साधारणतः चार तोडणीनंतर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये पीक परिपक्व होते. दुसऱ्या वर्षापासून पुन्हा लागवडीसाठी बिया किंवा कंद पेरण्याची गरज नसते. कारण कंदांमधून नवीन उगवण मेच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू होऊन जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत होते. पहिली तोडणी जुलैच्या पहिल्या आठवड्यात होते. एकच कंद ४५ वर्षे लागवडीसाठी वापरता येतो.

करटुले लागवड तंत्र :करटुलेची लागवड बियांद्वारे करता येते परंतु त्यातून उगवलेली रोपे एकसारखी राहत नाहीत. त्यामुळे कंद किंवा खोडाच्या कलमांद्वारे केलेली शाकीय लागवड अधिक फायदेशीर ठरते कारण त्यातून खरेखुरे व एकसंध उत्पादन मिळते. एका हेक्टरसाठी सुमारे



२.५ ते ५.० किलो बिया लागतात. उगवण क्षमता कमी असल्यामुळे व नर : मादी प्रमाण राखणे आवश्यक असल्यामुळे अधिक बियांची गरज भासते. जर नर व मादी रोपे आधी ओळखलेली असतील, तर २५००२६५० रोपे (२२००२३०० मादी व ३००३५० नर) एका हेक्टरसाठी पुरेशी ठरतात.

जमीन तयारी व पेरणी :जमीन समतल करून नांगरट व वखरणी करावी. शेवटच्या नांगरटपूर्वी १५-२० टन प्रति हेक्टर शेणखत टाकल्यास फळउत्पादन चांगले होते. प्रत्येक वेलीकरिता ५०५०५० से.मी. आकाराचे खड्डे २ मी २ मी अंतराने तयार करावेत. कुजलेले शेणखत (२:१:१) या मिश्रणाने भरावेत. सुवातीला रासायनिक खतांची मात्रा द्यावी.

खत व्यवस्थापन : सेंद्रिय खत - १५-२० टन/हेक्टर शेणखत शेत तयार करताना मिसळावे. रासायनिक खते - नत्र, स्फुरद व पालाश १००:६०:४० कि.ग्रॅ./हेक्टर या प्रमाणात द्यावेत. लागवडीपूर्वी पूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. नायट्रोजनचे अर्धे प्रमाण वेलींच्या वाढीच्या वेळी व उर्वरित फुलधारणेपूर्वी द्यावे.

तण नियंत्रण :करटुले पिकामध्ये तण आढळल्यास नियमितपणे तण काढणी करावी. याची मुळे उथळी असल्यामुळे हाताने तण काढणे किंवा खुडणीने तण काढणे हे उपाय सर्वोत्तम ठरतात.

पाणी व्यवस्थापन : बिया किंवा कंद लावल्यानंतर त्वरित पाणी द्यावे. नंतर गरजेनुसार पाणी द्यावे. पावसाचा खंड पडल्यास आठवड्यातून १-२ वेळा पाणी द्यावे.

पावसाळ्यात मात्र पाणी साचू नये याची विशेष दक्षता घ्यावी अन्यथा वेली कुजतात.

आधार देणे :करटुले हे वेलवर्गीय पीक असल्यामुळे त्यास आधार देणे आवश्यक असते. यासाठी लाकूड, बांबू किंवा लोखंडी तारांचा वापर करून एकेक काठी किंवा मंडप पद्धत वापरावी. यामुळे वेलींची वाढ सुकर होते आणि फळउत्पादनात वाढ होते.फुलोरा, परागीभवन व फळधारणा : फुलोऱ्याची सुरुवात - (१) रोपांची पुनर्लागवड केल्यानंतर : ५०६० दिवसांत (२) कंद लागवड केल्यानंतर : ३०४० दिवसांत. (फुलांची उघडझाप) संध्याकाळच्या वेळेस होते. हाताने परागीभवन केल्यास फळधारणेचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. तसेच योग्य परागीभवन न झाल्यास उत्पादन घटते. त्यामुळे शक्य तितक्या प्रमाणात कृत्रिम परागीभवन करून फळउत्पादन व नफा वाढवावा. विशेष लक्ष द्यावे की, करटुले हे द्विलिंगी पीक असल्यामुळे शेतात नर : मादी यांचे योग्य प्रमाण राखणे अत्यावश्यक आहे. यामुळे फुलोरा, परागीभवन व फळधारणा या सर्वांवर सकारात्मक परिणाम होतो.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९१६ : पाटणा उच्च न्यायालयाची स्थापना
१९२० : कोलकाता येथे महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकार आंदोलन सुरू केले.
१९३९ : दुसरे महायुद्ध जर्मनीने पोलंडमधील डांझिग शहर ताब्यात घेतले.
१९४५ : व्हिएतनामने (जपान व फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य घोषित केले.
१९४६ : भारतात अंतरिम सरकारची स्थापना झाली.
१९५८ : हेंड्रिक वरवोर्ड हे दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान म्हणून निवडून आले.
१९६० : केंद्रीय तिबेटी प्रशासनाची पहिली निवडणूक झाली.
१९७० : स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले.
१९७० : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपले अपोलो हे चंद्र मिशन काही कारणास्तव रद्द केले.
१९८७ : फिलिप्स कंपनीने पहिल्यांदाच बाजारात आणले.
१९९९ : भारतीय जलतरणपटू बुला चौधरी ही इंग्लिश खाडी दोनदा पोहणारी आशियातील पहिली महिला ठरली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३८ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचा जन्म. (मृत्यू: २३ जुन १९१४)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ विल्हेल्म ऑस्टवाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८७७ : फ्रेडरिक सॉडी नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २२ सप्टेंबर १९५६)
१८८५ : भारतीय समाजसुधारक, पत्रकार आणि श्री नारायण धर्म परिपालणाशी संबंधित क्रांतिकारक टी. के. माधवन यांचा जन्मदिन.
१८८६ : प्रा. श्रीपाद महादेव तथा श्री. म. माटे साहित्यिक, विचारवंत व अस्पृश्यता निवारणासाठी सतत प्रयत्न करणारे कृतिशील समाजसुधारक. १९१६ मध्ये त्यांनी दलितांसाठी रात्रशाळा काढली व वीस पंचवीस वर्षे मोफत शिकवले. (मृत्यू: २५ डिसेंबर १९५७)
१९२४ : केनिया देशाचे राष्ट्राध्यक्ष डॅनियेल अराप मोई यांचा जन्म.
१९३२ : स्नॅपल चे संस्थापक अर्नोल्ड ग्रीनबर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २६ ऑक्टोबर २०१२)
१९४१ : साधना शिवदासानी ऊर्फ 'साधना' चित्रपट अभिनेत्री
१९५२ : जिमी कॉनर्स अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू
१९५३ : अहमदशाह मसूद अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री (मृत्यू: ९ सप्टेंबर २००१)
१९६५ : भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक पार्थो सेन गुप्ता यांचा जन्म.
१९७१ : भारतीय अभिनेते आणि राजकारणी पवन कल्याण यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू इशांत शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

४२१ : कॉन्स्टान्शियस तिसरा (रोमन सम्राट, जन्म: ?).
१३९७ : फ्रांसेस्को लांडिनी (इटालियन संगीतकार, जन्म: १३२५).
१५४० : इथियोपियाचा सम्राट दावित (दुसरा) यांचे निधन.
१८२० : ज्यांगकिंग (चिनी सम्राट, जन्म: १३ नोव्हेंबर १७६०).
१८६५ : आयरिश गणितज्ञ विल्यम रोवन हॅमिल्टन यांचे निधन.
१९२१ : अँथोनी फ्रांसिस लुकास (अमेरिकन उद्योगपती, जन्म: ९ सप्टेंबर १८५५).
१९३७ : आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती चे स्थापक पियरे डी कौर्तिन यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८६३)
१९४७ : प्रसिद्ध भारतीय विद्वान, साहित्यकार व शिक्षणतज्ञ तसचं, अलाहाबाद आणि बनारस हिंदू विद्यापीठाचे माजी कुलगुरू अमरनाथ झा यांचे निधन.
१९६० : डॉ. शंकर पुरुषोत्तम आघारकर वनस्पतीतज्ज्ञ, 'विज्ञानवर्धिनी महाराष्ट्र' या संस्थेचे संचालक, त्यांनी पुणे व मुंबई येथील सर्व स्थावर मालमत्ता संस्थेस देणगी दिली. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रविज्ञा विभागातर्फे मिळणाऱ्या प्रतिवार्षिक अनुदानावर संस्थेचा खर्च चालतो. (जन्म:)
१९६४ : फ्रांसिस्को क्रॅव्हेरो लोपेस (पोर्तुगालचे वे१३ राष्ट्राध्यक्ष, जन्म: १२ एप्रिल १८९४).
१९६९ : हो ची मिन्ह व्हिएतनामचे राष्ट्रपती (जन्म: १९ मे १८९०)
१९७६ : गणेश आत्माराम तथा विष्णू सखाराम तथा 'वि. स.' खांडेकर मराठी लेखक, कादंबरीकार, लघुनिबंधकार व समीक्षक, १९४१ मध्ये सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पद्मभूषण (१९६८), साहित्य अकादमी फेलोशिप विजेते (१९७०), त्यांनी 'कुमार' या टोपणनावाने कविता लेखन तर 'आदर्श' या टोपणनावाने विनोदी लेखनही केले आहे. त्यांच्या 'ययाति' या कादंबरीसाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९७४) मिळाला आहे. (जन्म: १९ जानेवारी १८९८)
१९७८ : फ्रेड जी. मायर (अमेरिकन उद्योगपती, जन्म: २१ फेब्रुवारी १८८६).
१९९० : नरहर शेषराव पोहनेरकर निबंध, लघुकथा, कादंबरी, कविता आदी साहित्यप्रकार हाताळणारे लेखक आणि 'मराठवाडय़ाचा चालताबोलता इतिहास' (जन्म: ३ आक्टोबर १९०७)
१९९६ : पॅडी क्लिफ्ट (झिम्बाब्वेचे क्रिकेट खेळाडू, जन्म: १२ जुलै १९५३).
१९९९ : डी. डी. रेगे विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले चित्रकार व लेखक, लोकसभा व विधानसभेतील अनेक राष्ट्रपुरुषांची चित्रे त्यांनी काढलेली आहेत. (जन्म: १७ डिसेंबर १९११ पाचल, राजापूर, रत्नागिरी)
२००९ : आंध्र प्रदेशचे १४ वे मुख्यमंत्री वाय. एस. राजशेखर रेड्डी यांचे विमान अपघातात निधन (जन्म: ८ जुलै १९४९)
२००१ : विश्वातील पहिले कृत्रिम हृदय प्रत्यारोपण करणारे दक्षिण आफ्रिकेतील महान हृदय विशेषज्ञ व सर्जन क्रिस्टियन बर्नार्ड यांचे निधन.
२०११ : रीनिवास विनायक खळे तथा 'खळे काका' संगीतकार, पद्मभूषण (२०१०) (जन्म: ३० एप्रिल १९२६)
२०१४ : भारतीय वकील आणि राजकारणी गोपाल निमाजी वाहनवती यांचे निधन. (जन्म: ७ मे १९४९)
२०१७ : शिरीष पै कवयित्री, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. शिरीष पै यांचे 'एक तारी', 'एका पावसाळ्यात', 'गायवाट', 'कस्तुरी', 'ऋतुचक्र' असे अनेक कवितासंग्रह वाचकांनी डोक्यावर घेतले आहेत. 'लाल बैरागीण', 'हेही दिवस जातील' या कादंबऱ्यांचे लेखनही शिरीष पै यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आदिवासी भटकेविमुक्तांचे उमेदवार निवडून द्या

## वंचित बहुजन आघाडीचे सुजात आंबेडकर यांचे आवाहन:जामखेड मध्ये राज्यस्तरीय भटके विमुक्त परिषद

जामखेड । प्रतिनिधी

आगामी काळात कर्जत जामखेड मतदारसंघात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषद निवडणुकीमध्ये आदिवासी भटके समाजातील जास्तीत जास्त उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी चे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले. ग्रामीण विकास केंद्र जामखेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्थेच्या वतीने जामखेड येथील महावीर मंगल कार्यालयात भटके स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित भटके विमुक्तांच्या राज्यस्तरीय परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्राध्यापक किसन चव्हाण, आदिवासी नेते अनिल जाधव, डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्थेचे नंदू मोरे, लोकाधिकार आंदोलन संघटनेचे प्रवक्ते बापू ओहोळ, भटके-विमुक्तांचे नेते अंबर चव्हाण आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना युवा नेते सुजात आंबेडकर म्हणाले की, वेळप्रसंगी समविचारी पक्ष व संघटनांना सोबत घेऊन आपण कर्जत जामखेड तालुक्यातून जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषद निवडणूक का मोठ्या उत्साहाच्या




वातावरणात लढवायच्या आहेत. इथून पुढे आपले प्रश्न आता आपल्यालाच मांडावे लागणार आहेत. त्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे आपले हक्काचे विचारपीठ सर्वांसाठी उपलब्ध आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील आपले प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. या बाबत आपण सरकारला जाब विचारला पाहिजे असे ते म्हणाले. मागील विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मायक्रो ओबीसींचे २३ उमेदवार उभे केले होते. याची आठवण ही त्यांनी यावेळी करून दिली. दलित आदिवासी व भटक्या विमुक्तांवरील अन्याय दिवसेंदिवस वाढत आहेत. त्याचा आपण एकजुटीने मुकाबला केला पाहिजे. सोमनाथ सूर्यवंशींची केस ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वतः कोर्टात वकील म्हणून उभा राहून जिंकली. अशा अनेक लढाया आपल्याला भविष्यकाळात लढायच्या आहेत आणि त्या जिंकायचे आहेत असे ते असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना प्राध्यापक किसन चव्हाण म्हणाले की, या देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. मात्र या देशातील आदिवासी आणि भटके विमुक्तांना मात्र ३१ ऑगस्ट १९५२ ची वाट पाहावी लागली. ज्या संविधानाने आपल्याला हक्क आणि अधिकार दिले, ते संविधान अजून आदिवासी भटके भुक्तांच्या पालापर्यंत पोहोचले नाही. हे संविधान आपल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला सर्वप्रथम काम करावे लागेल.

ॲड अरुण जाधव म्हणाले की, आपल्याला आपल्या सगळ्यांचा स्वाभिमान जिवंत ठेवायचा असेल, आणि प्रस्थापितांची गुलामी करायची नसेल तर त्यासाठी एकमेव पर्याय आहे तो म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कुटुंब होय. तुमच्या आमच्यासारख्या रस्त्यावर लढणाऱ्या अनेक सर्वसामान्य कुटुंबाची जबाबदारी आणि काळजी आंबेडकर घराण्याने घेतली आहे. त्यामुळे इथून पुढे इतर कुणाशीही पंगा घ्या, मात्र आंबेडकर घराण्याची कदापिही पंगा घेऊ नका असा कडक इशारा त्यांनी प्रस्थापितांना दिला. यावेळी आदिवासी नेते अनिल जाधव, नंदू मोरे, भटके-विमुक्तांचे नेते अंबर चव्हाण यांचीही भाषणे झाली. भटके-विमुक्त, आदिवासी संयोजन समितीच्या सदस्या उमाताई जाधव यांनी प्रास्ताविक केले. ललिता पवार, लता सावंत, पल्लवी शेलार, रेश्मा बागवान व शितल पवार यांनी विविध ठरावांचे वाचन केले. बापू ओव्होळ, राजू शिंदे, तुकाराम पवार यांनी कर्जत जामखेड तालुक्यातील भटके विमुक्तांच्या संशोधन अहवालाचे वाचन केले.

**तहसील कार्यालयापासून भटके मुक्तांची रॅली :** सकाळी ११ वाजता जामखेड येथील तहसील कार्यालयापासून भटके मुक्तांची रॅली निघाली होती. या रॅलीमध्ये बहुरूपी, गोसावी, उमाजी नाईक वेशभूषा, वासुदेव, मरीआईवाला, पोतराज, नंदीवाले, कुरमुडी जोशी, स्मशान जोगी, फासेपारधी, वैदु, उंटवाले, जोशी, वाघ्या मुरळी, मदारी, भोई, डोंबारी, कैकाडी, आदी सहभागी झाले होते.महावीर मंगल कार्यालयातील विचार पिठावर सुप्रसिद्ध शाहीर शीतल साठे व सचिन माळी आणि सहकाऱ्यांचा नवयान आंबेडकरी जलसा सादर झाला. या परिषदेमध्ये मुस्लिम पंच कमिटी, राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शेतकरी संघटना, प्रहार संघटना यांच्या सह समविचारी पक्ष आणि संघटनाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.फ

## नदीपात्रातील अतिक्रमणे, प्रदूषण व विविध मुद्द्यावरील संवाद सत्रात ५० सेवाभावी संस्थांचा सहभाग



जालना। प्रतिनिधी

कित्येक वर्षापासून जालना शहरासाठी वरदान ठरत असलेल्या घाणेवाडी तलाव अर्थात संत गाडगेबाबा तलावाचे संरक्षण आणि संवर्धन होणे अत्यंत महत्त्वपूर्ण असून, उध्वस्त झालेले दोन्ही सांडवे अत्यंत गंभीर बाब आहे. हाताला कधीही फुटण्याची व्यक्त करण्यात येत असलेली भीती विचारात घेता, यात लक्ष घालण्याबाबत आपण नूतन जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. एवढ्यावरच न थांबता थेट मुख्यमंत्र्यांना भेटून गांभीर्य लक्षात आणून दिले जाणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी सांगितले. जालना शहरासह जिल्ह्याच्या कायापालट करण्यासाठी आपणा सर्वांना हातात हात घालून वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जाऊन काम करावे लागेल, प्रशासकीय कामांसाठी दबाव गट तयार करावा लागेल, अशी साद घालत, यासंदर्भात प्रत्येक महिन्याला बैठक घेऊन विचार मंथन करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याचे ते म्हणाले. जालना शहरातील पाणीटंचाई, पर्यावरण, दुरवस्था झालेल्या संत गाडगेबाबा जलाशयाचे संवर्धन, कुंडलिका सीना नदी पुनरूज्जीवन तसेच पर्यावरण संरक्षणार्थ (हरित क्षेत्र विकसित करणे) चर्चा, प्रारूप आराखडा नियोजन व इतर विषयांबाबत खा. काळे यांनी शनिवार दि. ३० ऑगस्ट रोजी आयसीटी कॉलेजच्या सभागृहात ५० सेवाभावी संस्थांसह व्यापारी, उद्योजकांशी संवाद साधला. व्यासपीठावर महिकोचे चेअरमन राजेंद्र बारवाले, कलश सीड्सचे व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, भाईश्री रमेशभाई पटेल, ,सुनीलभाई रायठठ्ठा यांची उपस्थिती होती.याप्रसंगी झालेल्या चर्चेत घाणेवाडी जलसंरक्षण मंचचे शिवरतन मुंदडा, कुंडलिका सीना फाउंडेशनचे उदय शिंदे, समस्त महाजन ट्रस्टचे सुरेश कुलकर्णी, जलसंधारण विभागाचे सेवानिवृत्त अभियंता रघुनाथ कल्याणकर विनीत सहानी, संजयकुमार दाड, उद्योजक अर्जुन गेही, सरोदे, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज, संजय देशपांडे, डॉ. विठ्ठल पवार, सहकार भारतीचे अध्यक्ष सचिन वाणी, सीए अजित छाबडा, आशिष पाठक, रोटरीच्या डॉ. प्रतिभा श्रीपत, राजेभाऊ विद्या जाधव, चैतन्य वराडे आदींनी सहभाग नोंदविला. बोगस पीआर कार्ड, खंडणीखोर आणि भूमाफियांचा बंदोबस्त करणे, नद्यांचा संरक्षणासाठी रेड आणि ब्लू लाईन मार्किंग, जालन्यातून नव्याने वंदे भारत ट्रेन, वाढते प्रदूषण, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळ सुरू ठेवण्यासाठी मास्टर फुलंब्रीकर नाट्यगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहाचे नूतनीकरण आदी उपस्थित झालेल्या मुद्द्यांवर साधक बाधक चर्चा झाली. उमेश बजाज यांनी नद्या संवर्धनसाठी ब्ल्यू लाईन आणि रेड लाईनची मार्किंग करून मध्यभागी घनदाट वृक्ष लागवड करण्यात यावी, यासाठी रोटरी योगदान देण्यास तयार असल्याचे सांगितले.

### तालुका पातळीवरही नदीजोड प्रकल्प व्हावेत-शिवरतन मुंदडा

शिवरतन मुंदडा म्हणाले की, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाशी प्रत्येक नागरिक जुडला गेल्यानंतर नदी संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले. निसर्ग पूर्वीप्रमाणेच आहे. फक्त पडणाऱ्या पावसाचे पाणी साठविणे आणि जमिनीत जिरविणे गरजेचे आहे. जिल्ह्यात २३६ कोल्हापुरी बंधारे आहेत. खोलीकरणही होत आहे. मात्र, लोखंडी दरवाजे चोरीला जात असल्याने पाणी वाहून जाते. यावर पर्याय म्हणून दरवाजांऐवजी दोन ते अडीच मीटर उंच भिंत उभी केल्यास ही समस्या मार्गी लागू शकते. तालुकास्तरावर देखील नदीजोड प्रकल्प हाती घ्यावा यासाठी, खा. कल्याण काळे यांनी लक्ष घातल्यास ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पाणी पातळी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## डिझेल चोरी करणारी मध्यप्रदेशची टोळी पकडली

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात होत असलेले डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस करण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना समृध्दी महामार्गावरील व ईतरत्र ठिकाणी होणाऱ्या डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने डिझेल चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेत असतांना श्री हॉटेल, लक्ष्मीकांत नगर समोर, अंबड रोड, जालना येथे डिझेल चोरी करणारे तीन संशयित इसम थांबलेले असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने त्याठिकाणी जावुन इसम नामे १) समीर नूर मोहम्मद मेव, वय-२८ वर्ष, रा.दोपाडा, जि.शाजापुर, राज्य मध्यप्रदेश २) हनिफ खान मुंशी खान, वय-३२ वर्ष, रा.दोपाडा, जि. शाजापुर, राज्य मध्यप्रदेश ३) हुसैन खान अजिज खान, वय-२७ वर्ष, रा. सुजानपुर, जि. शाजापुर, राज्य मध्यप्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी व जालन्यातील दोन साथीदारांनी मिळून दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ०४:३० वाजेच्या सुमारास समृध्दी महामार्गावरील गुंडेवाडी पेट्रोलपंपाजवळ ट्रक चालकास तलवारीचा धाक दाखवुन ट्रकमधुन १०० लिटर डिझेल चोरी केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने चंदनझिरा पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं.३७९/२०२५ कलम ३०९(६), ११५(२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४,२५ भा.ह.का. दाखल असुन त्यामधील मुददेमाल यापुर्वीच जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक १५/०८/२०२५ रोजी सकाळी ०१:०० वाजेच्या सुमारास समृध्दी महामार्गावर एका कंटेनर ट्रकमधुन ७० लिटर डिझेल चोरी केल्याची कबुली दिली. त्याअनुषंगाने व पोस्टे चंदनझिरा, जालना गु.र.नं.४०६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हा करतांना आरोपीतांनी वापरलेले रु.३१,०००/- किंमतीचे तीन मोबाईल जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, अशोक जाधवर यांनी केली आहे.



## कचरा उचलण्यासाठी महानगरपालिकेकडून नियोजन




जालना। प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी देखील शहरात २७ ऑगस्ट रोजी घरगुती व सार्वजनिक मंडळात श्री. गणेशाची स्थापना करण्यात आलेली आहे. करिता स्थानिक जिल्हा प्रशासनाने जालना शहरातील सर्व घरगुती व सार्वजनिक गणपती मंडळाकडुन निर्माण होणा-या कच-याचे योग्य प्रकारे नियोजन महानगरपालिका कडून करण्यात आले आहे. अशी माहिती महानगरपालिका चे आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिली आहे.

करिता शहरात विविध ठिकाणी आजपासून सार्वजनिक गणपती मंडळांव्दारे भंडारे आयोजित केले जातात. या भंडारादरम्यान तयार झालेला कचरा महानगरपालिकेद्वारे उचलून घेण्यासाठी व कच-याचे योग्य प्रकारे नियोजन करणेकरिता श्री. सुधीर डहाळे, वाहन विभाग प्रमुख, जालना मनपा यांना नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. करिता शहरातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांना आवाहन करण्यात येते की, आपल्या मंडळाचा ज्या दिवशी भंडारा असेल. त्या दिवशी श्री. सुधीर डहाळे, वाहन विभाग प्रमुख, जालना मनपा यांना संपर्क करावा (मो.क्र. ८३२९९१०४२५) जेणेकरुन आपल्या मंडळाचा भंडारामध्ये निर्माण झालेला कचरा महानगरपालिकेव्दारे संकलन करता येईल.

## खैरी धरण ओव्हर फ्लो ;शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

खर्डा। प्रतिनिधी

जामखेड तालुक्यात सर्वात मोठे असणारे खैरी धरण ओव्हर फ्लो झाले आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु झाला आहे. सध्या बालाघाटात परिसरात सतत पाऊस झाल्याने खैरी धरण ओव्हर फ्लो झाले आहे.तर धरणाच्या विसर्गात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे, अशी माहिती खैरी प्रकल्पाचे शाखा अभियंता गणेश काळे यांनी दिली. धरणाच्या भिंतीवरून ९.०० क्युसेक्स विसर्ग सुरु झाला आहे. खैरी धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे खर्डा परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. जामखेड तालुक्यातील सर्वात मोठे धरण आहे. १९७८ साली या धरणाचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. १९९० साल ते पूर्ण झाले. तेव्हापासून धरणात पाणी साठवले जाते. खैरी मध्यम प्रकल्पाचा एकुण पाणीसाठा ५३३.६ द.ल.घ.फु (१५.११ द.ल.घ.मी.) इतका असुन उपयुक्त पाणीसाठा ४८५.२२ द.ल.घ.फु (१३.७४ द.ल.घ.मी.) आहे.

गेल्या ३५ वर्षांत खैरी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची आजची १६ वी वेळ आहे. तर धरण बांधल्यापासून ऑगस्ट महिन्यात धरण भरण्याची आजची चौथी वेळ आहे. यापुर्वी १९९८, २०१०, २०२४ या तीन वर्षी धरण ऑगस्ट महिन्यात भरले होते. सर्वसाधारणपणे हा प्रकल्प सप्टेंबर महिन्यात भरतो. खैरी मध्यम प्रकल्पाच्य नदीकाठाजवळ वंजारवाडी, तरडगाव, सोनेगाव, धनेगा चिंचपूर बुद्रुक, पांढरेवाडी ही गावे आहेत तर प्रकल्पाच्? बुडीत क्षेत्राजवळ सातेफळ, वाकी, लोणी बाळगव्हान खर्डा या गावांचा समावेश होतो.

खैरी प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे प्रकल्प ऑगस्ट मध्येच पूर्ण क्षमतेने भरून सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे.

तसेच प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस पडत असून प्रकल्पाचे पाणी साठ्यात वेगाने वाढ होत आहे. दिनांक २९/०८/२०२५ रोजी दुपारी ०३ वाजून ११ मिनिटांनी खैरी धरणाच्या सांडव्यावरून नदीपत्रात ९ क्युसेक्स इतका विसर्ग सुरू आहे.खैरी मध्यम प्रकल्प ओव्हर फ्लो झाल्यामुळे नदीपात्रातील विसर्गात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाचे वतीने प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राजवळील व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणारी नदी काठाजवळील गावे, वस्त्या, वाडे, तांडे येथील शेतकरी व ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

बुडीत क्षेत्रातील व पुर रेषेपर्यंतच्या नदीपात्रातील आपट प्राणी, पशुधन, मौल्यवान वस्तू, कृषी पंप, शेती औजारे इत्यादी सुरक्षित जागी हलवण्याबाबत सूचित करण्यान आले आहे. सांडव्यातून नदीपात्रात विसर्ग वाढण्याची शक्यता असल्यामुळे पाणी येण्याची शक्यता असल्याने सांडव्यातून व नदीपात्रातून ये-जा करताना दक्षता घेण्यात यावी, असे अवाहन खैरी प्रकल्पाचे शाखा अभियंता गणेश काळे यांनी केले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४९८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २१/०८/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) कृष्णा ओमप्रकाश लाहोटी नं.प.मि.नं.१८-६५-५९-११-५७ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-६५-५९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- रस्ता/केदार मालपाणी यांचे घर
पश्चिम : रस्ता/रस्ता
दक्षिण- प्लॉट नं.६०/साजाता लाहोटी व संगिता लाहोटी यांचे घर
उत्तरः प्लॉट नं. ५८/रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

Daily Rajya Loktantra Date 02/09/2025

**PUBLIC NOTICE**

NAME CHANGE"I HEREBY DECLARE THROUGH THIS PUBLICATION THAT MY NAME HAS BEEN CHANGED"OLD NAME: SHEKH MAHAMAD RAFIK SHEKH HANIF "NEW NAME: MOHAMMAD RAFIQ SHAIKH MOHAMMAD HANIF "ADDRESS: FATTESINGPURA LANE NO 2 NEHRU NAGAR KAT KAT GATE ROAD NEAR HAFIZ MASJID AURANGABAD PIN Code: 431001 Mo. No.: 9970525374 THIS DECLARATION IS MADE FOR ALL LEGAL PURPOSES.

## पंतप्रधान मोदींजींच्या प्रेरणादायी विचारांनी कार्यकर्त्यांना नवचेतना-दानवे

जालना। प्रतिनिधी

भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता ''मन की बात'' या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा मुख्य कार्यक्रम भाजप जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाला. कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे हे स्वतः उपस्थित होते. ''पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी असून, 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे देशहिताचे विचार, सामाजिक जाणीवा आणि नवचेतना निर्माण होते.'' असे त्यांनी सांगितले.



यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, सतीश जाधव, सोपन पेंढारकर, धनराज काबलिये, शशिकांत घुगे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, भागवत बावणे, कपिल दहेकर, सिद्धिविनायक मुळे, विष्णू डोंगरे, देविदास देशमुख, अनिल सरकटे, कैलास उबाळे, सुभाष सले, आदींसह अनेकांची उपस्थिती होती.तसेच सदरील कार्यक्रम भाजपा जालना महानगरातील विविध मंडळात आयोजित करण्यात आला यावेळी सुनील खरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जुना जालना मंडळात मंडळ अध्यक्ष महेश निकम, अमोल धानुरे , संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिला मोर्चा, युवा मोर्चा, व्यापारी आघाडी, अनुसूचित जाती-जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा, इत्यादी आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी ''मन की बात'' कार्यक्रम ऐकला.

# लहान मुलीवर अत्याचार घटनेच्या निषेधार्थ मुस्लिम समाज आक्रमक

## खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा आणि लवकरच लवकर फाशीची शिक्षा देण्याची मागणी

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरात अत्याचार प्रकरणात परळीतील मुस्लिम समाज आक्रमक झाल्याचं दिसून येते आहे, आज दुपारी सकल मुस्लिम समाज परळीच्या वतीने संभाजीनगर पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. या वेळी बोलताना मुफ्ती अश्फाक साहेब यांनी सांगितले आहे की हे अतिशय निंदनीय घटना आहे, जे ३ सप्टेंबरला परळी बंदचा आवाहन सामाजिक संघटना यांनी केलं आहे त्याला सकल मुस्लिम समाज परळीच्या वतीने पाठिंबा देण्यात आलं आहे.




सविस्तर माहिती अशी आहे की १) जे घटना घडली आहे त्या केसला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा आणि लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी, २) हे घटना जेव्हा समोर आली त्यावेळी त्या एका झठक्र कर्मचारी ज्याच्या नाव किशोर मनिकरणी यांनी त्या मुलीच्या आई

### परळी बंदला सकल मुस्लिम समाजातर्फे पाठिंबा जाहीर

वडीलांना सोबत अपशब्द वापरले आणि त्यांना रेल्वे स्थानकाच्या बाहेर हाकलून दिलं, असा प्रथमदर्शनी नागरिकांच्या म्हणणं आहे याची चौकशी करून त्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी आणि त्याला पण सह आरोपी करण्यात यावं ३)परळी रेल्वे पोलिसांनी यापुढे रेल्वे परिसरात आपली सुरक्षा वाढवावी आणि रेल्वे स्थानक परिसरात जे नशेडी बसत आहे त्यांच्यावर ही रेल्वे पोलिसांनी कारवाई करावी ४) शहरात अनेक ठिकाणी गुटखा,गांजा आणि अनेक अंमली पदार्थ विकणाऱ्या वर ही कारवाई करण्यात यावी, या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे यावेळी मुफ्ती अश्फाक साहेब,नजीर अहेमद सर, गफ्फार शाह,साजेद बबलु,जुबेर भाई बाबा, शरीफ भाई,बदर भाई,शहेरयार सय्यद सह अनेक परळीतील राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कपिलधारवाडी येथून आंदोलकांसाठी चटणी-भाकरी मुंबईला रवाना

बीड । प्रतिनिधी

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षण चळवळीतील संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील उपोषणाला बसले असून त्यांना साथ देण्यासाठी राज्यभरातील मराठा बांधव मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. सरकारने आझाद मैदान परिसरातील हॉटेल बंद ठेवले असल्याने आंदोलनकऱ्यांच्या जेवण-पाण्याची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील. गावकऱ्यांनी आंदोलकांसाठी शिदोरीची मोठी व्यवस्था केली. आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर ठिकठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनांना



गावोगावी मोठा प्रतिसाद मिळत आहे. आंदोलकांच्या जेवणाची सोय करण्यासाठी ग्रामीण भागातील महिला पुढाकार घेत आहेत. या पुढाकारात कपिलधारवाडी ग्रामस्थांनी आंदोलन स्थळी भाकरी, ठेचा, कांदा, भात व पाणी यांची शिदोरी पाठवली आहे. शेतकरी व गृहिणी स्वतः बनवलेले जेवण आंदोलकांपर्यंत पोचवत असून, आंदोलन हे आपल्यासाठीच आहे या भावनेतून ही मदत केली जात आहे. ग्रामीण संस्कृतीचा आणि एकोपा दाखवणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास्पद ठरत आहे. भाकरी-ठेच्याच्या साध्या पण पौष्टिक शिदोरीमुळे आंदोलकांचा उत्साहही दुणावला आहे. ही शिदोरी फक्त जेवणापुरती मर्यादित नसून, मराठा समाजाच्या ऐक्याचे प्रतीक मानली जात आहे.

# जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी मनिषा चवरे

**आष्टी । प्रतिनिधी**

**मराठा सेवा संघाचा स्थापना दिवस आणि ३५ वा वर्धापन दिनानिमित्त बीड येथे रविवार दि ३१ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमात जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आली.**

जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्ह्याच्या कार्याध्यक्षपदी मनिषाताई महेश चवरे तर बीड जिल्हा संघटकपदी ड. निर्मलाताई विलास सोनवणे यांची निवड करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई



माने आणि जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा प्रा. संगीताताई शिंदे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन निवड केली.

या प्रसंगी एम.बी.बी.एस. परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक ठाकरे हे होते. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक गोविंद कदम, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय शेंडगे, डॉ. उर्मिलाताई शिंदे, डॉ. शरद शिंदे आदी मान्यवर तर महिला, पुरूष, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.जिजाऊ ब्रिगेडच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी मनिषाताई चवरे व ड निर्मलाताई सोनवणे यांच्या निवडीबद्दल संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रा शशिकांत कन्हेरे,सुवर्णाताई गि-हे, इंजि. तानाजी जंजिरे, लक्ष्मण रेडेकर, ड .सीताराम पोकळे, बन्सीधर मोरे, शिरीष थोरवे, भास्करराव निंबाळकर, अविनाश जगताप यांच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्त्यां व आदींनी अभिनंदन केले आहे.

# राजुरी येथे आज महंत शिवाजी महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**श्री मंगलमुर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार आहे.**



स्व.केशरकाकू क्षीरसागर आणि स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून आरंभ झालेल्या सप्ताहाची सांगता आज मंगळवार दि.०२ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत ह.भ.प.प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने होणार असून यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. अर्जुन महाराज मोटे पळशी, जलाल महाराज सय्यद नाशिक, मत्सेंद्र महाराज निकम नेवासा, पांडुरंग महाराज उगले परभणी, नरेंद्र महाराज गुरव मालेगाव, साध्वी वैष्णवी दिदी सरस्वती आळंदी, गोविंद महाराज गोरे यांची कीर्तन सेवा झाली. या सप्ताहाची सांगता आज होणार असून त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी या सप्ताहाच्या सांगतेला भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मंगलमूर्ती देवस्थानचे अध्यक्ष रवींद्र क्षीरसागर व समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

# ॲड.किशोर खेडकर यांची काँग्रेसच्या शहर सचिवपदी निवड



बीड । प्रतिनिधी

ॲड.किशोर खेडकर यांची काँग्रेसच्या शहर सचिव तसेच विधी अधिकारी म्हणून निवड झाली आहे . त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे व बीड शहरध्यक्ष परवेज कुरेशी यांची उपस्थितीमध्ये देण्यात आले.भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पार्टीची नवीन कार्यकारिणी आज जाहीर करण्यात आली आहे..नक्कीच या पुढे पक्ष्याचा विस्तार आणि विकास या साठी आम्ही प्रयत्नशील असू त्यांच्या या निवडीचे ॲड अनिल बारगजे,ड जावेद मणियार,ड सतीश चव्हाण, ड झिने बन्सी, घुगे दादासाहेब, शेख सोहेल, कामरान खान , ॲड.सय्यद मोईन, रिजवान पटेल, सय्यद सलमान, अजहर शेख, साजिद खान, अयान पाशा आदींनी स्वागत केले आहे.





**आष्टी : शहरातील माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांच्या निवासस्थानी गौराई आगमन , पत्रकार शरद रेडेकर यांच्या घरातील गौराई**

# हुतात्मा स्मारकाची होणार स्वच्छता आणि रंगरंगोटी

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

**आगामी १७ सप्टेंबर रोजी बीड शहरातील हुतात्मा स्मारकावर आयोजित कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर सोमवार दिनांक १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्मारकाची पाहणी केली . जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार चंद्रकांत शेळके, नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रकांत बोराडे यांनी स्थळाला भेट देऊन आवश्यक कामांची तपासणी केली.**



यावेळी स्मारक परिसरातील स्वच्छता , रंगरंगोटी आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली . नगरपरिषदेचे नगर अभियंता किरण देशमुख , मंडळ अधिकारी सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी शब्बीर शेख , स्वच्छता विभाग प्रमुख भागवत जाधव आणि स्वच्छता निरीक्षक आयुब शेख आदी अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित होते.प्रशासनाने स्मारक परिसर स्वच्छ , आकर्षक आणि सुव्यवस्थित ठेवण्याच्या सूचना दिल्या असून नागरिकांच्या सहभागातून हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी तयारी करण्यात येत आहे . १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# प्रा.वसंत खेमगर सेट परीक्षा उत्तीर्ण

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आष्टी येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्? डा. बाळासाहेब खेमगार यांचे चिरंजीव तथा आष्टी येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्रा.वसंत खेमगर विद्यापीठ अनुदान आयोग यांच्यावतीने घेण्यात येणारी सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. या परीक्षेमध्ये ३०० गुणांपैकी २२४ गुण मिळवून प्रथम श्रेणीत त्यांनी हे यश संपादन केले आहे. प्रा.वसंत खेमगर यांचे पदवीचे शिक्षण आष्टी येथील श्री.छत्रपती शाहू, फुले,आंबेडकर कृषी



महाविद्यालयात झाले आहे. त्यांनी मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून बॅचलर ऑफ आर्ट्स पदवी संपादन केली आहे. त्यांनी बी. पीएड.पदवी व एम.पीएड.पदव्युत्तर पदवी बीड येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयातुन प्राप्त केली आहे.१५ जून २०२५ रोजी विद्यापीठ अनुदान आयोग दिल्ली यांच्यावतीने घेण्यात आलेल्या सेट परीक्षेमध्ये पहिल्याच प्रयत्नात प्रा.वसंत खेमगर यांनी हे यश संपादन केले आहे.याबद्दल प्रा.खेमगर यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांनी प्रा.वसंत खेमगर यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम आरसुळ, प्रा. राजाभाऊ ढोबळे, उपप्राचार्य डा. आप्पाराव टाळके, प्रा.जानकु महारनवर,गोरख खेमगर,संजय खेमगर, समीर खेमगर,सूरज खेमगर,सतिश खेमगर उपस्थित होते.शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन धिकारी डॉ.डी.बी.राऊत, प्रा.शिवदास विधाते यांच्या हस्ते आनंद शैक्षणिक संकुल या ठिकाणी प्रा.वसंत खेमगर यांचा सत्कार करण्यात आला.

### बेकायदेशीर प्रस्ताव डिसमिस होणार

बीड । प्रतिनिधी

बीडच्या शिक्षण विभागात तत्कालीन वादग्रस्त शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातील जिल्ह्यातील सर्वच्या सर्व बेकायदेशीर प्रस्ताव डिसमिस होण्याची शक्यता आहे. शिक्षणाधिकारी आणि संस्था चालकांच्या संगनमताने नियुक्तीचा मोठा गैरप्रकार झाला असून शिक्षण क्षेत्रात आता कसून चौकशी होणार आहे. बीड जिल्ह्यातील २०९ बोगस मान्यता प्रस्ताव असल्याचे सांगण्यात येत असून याची आता कसून चौकशी होणार आहे.



जालना : धावेडी तालुका जालना येथील ग्रामपंचायत अधिकारी सौ अलका सुदर्शन वाघ यांच्या घरी गौरीचे मोठ्या थाटामाटात आगमन करण्यात आले यावेळी भव्य दिव्य सजावट करण्यात आली.

# मेंडके कुटुंबात गौराई आल्या बुलेटच्या सोनपावली

## माजलगाव परिसरात गौराईचे उत्साहात स्वागत

**माजलगाव । प्रतिनिधी**

**महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरी,अर्थात संपत्तीची देवता, ज्येष्ठा,कनिष्ठा गौरी लक्ष्मीचे प्रतीक आहे. त्या ज्येष्ठा कनिष्ठा गौरी महालक्ष्मीचे रविवारी दि.३१ ऑगस्ट माजलगाव येथील तानाजी नगर परिसरासह तसेच जिल्हाभरात घरोघरी उत्साहात स्वागत करण्यात आले.**

यावर्षी महिलांनी रविवारी सायंकाळी ५:२५ पर्यतचा मुहूर्त



साधून गौरींचे पूजन करून घरात आणले. तीन दिवसीय उत्साह सोहळ्याला सुरुवात केली. काही कुटुंबीयांनी गौरींच्या उभारणीसाठी अगोदरच तयारी करून ठेवली होती. मेंडके कुटुंबातील महिलांनी बुलेट बाईक वरील गोरी असा देखावा सादर केला.रविवारी रात्री गौरींची प्रतिष्ठापना केली व विविध धान्यांच्या राशी मांडून आकर्षक सजावट करण्यात आली.दि.१ सप्टेंबर सोमवार रोजी गौरीपूजन व भोजन झाले तसेच दि. २ मंगळवार रोजी गौरी विसर्जन रात्री ९:५० पर्यतचा मुहूर्त आहे.तानाजी नगर माजलगाव येथील प्रियंका रामेश्वर मेंडके यांच्या निवासस्थानी प्रतिवर्षाप्रमाणे मेंडके परिवारातील सुहासीनींनी व मुलींनी गौरींचे उत्साहात आगमन करून रविवार रोजी प्रतिष्ठापना केली.

# सेवा पंधरवडा : जनतेच्या समस्या सोडवण्याचा लोकाभिमुख उपक्रम

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांक २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्यभर सेवा पंधरवडा राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे . महसूल व वन विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये सामान्य जनतेच्या दैनंदिन समस्या , शेतकऱ्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी विशेष मोहीमा राबवल्या जाणार आहेत .

जनतेच्या हिताचा विचार करणारा



शासन निर्णय म्हणजेच लोकाभिमुख प्रशासन . याच धर्तीवर शासनाने तीन टप्प्यांमध्ये हा उपक्रम उभारला आहे . पहिला टप्पा - पाणंद रस्ते विषयक मोहीम - शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाणाऱ्या पाणंद रस्त्यांचे संरक्षण , नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे , शेतजमिनीपर्यंत रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी सीमांकन , रस्ता अडथळे दूर करणे अशा कामांवर भर दिला जाणार आहे .

पिके लावूनही जर रस्ता
नसेल, तर शेतकरी काय करील ?
धान्य द्यायला रस्ता
नसेल, तर भाकर कोण शिजवील ?

या प्रश्नांची उत्तरे शासनाने या मोहिमेतून शोधण्याचा प्रयत्न केला आहे . दुसरा टप्पा - सर्वांसाठी घरे व पात्रांना पट्टे वाटप : दिनांक २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबरदरम्यान या टप्प्यात ' सर्वांसाठी घरे ' या योजनेअंतर्गत राहिवाशांना शासकीय जमिनीवरील नियमित हक्क देणे , झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन , शेतकऱ्यांना पट्टे वाटप , तसेच गरजूंना कायमस्वरूपी मालकीचा अधिकार देण्याचे काम केले जाणार आहे .

घर हेच सुखाचं मूळ,
घराशिवाय संसार कसा फुल ?
शेतकऱ्याला जमीन, नागरिकाला घर,
यातूनच दिसेल समृद्धीचा दरबार !

तिसरा टप्पा - नावीण्यपूर्ण उपक्रम - दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान जिल्हाधिकारी स्थानिक समस्यांवर उपाययोजना राबवतील . पाणी , जमीन , आरोग्य , शिक्षण यासंबंधी जिल्ह्यातील स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन पुढाकार घेईल . यातूनच शासनाचा लोकाभिमुखताचा चेहरा अधिक स्पष्ट होईल.हा निर्णय शेतकऱ्यांसाठी

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार, दि.०२ सप्टेंबर २०२५ । पान ७

# माळेगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी !

## मिनीबस चोरीचा गुन्हा उघडकीस; ७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

पुणे । प्रतिनिधी

माळेगाव पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने प्रभावी कारवाई करत मिनीबस चोरीचा गुन्हा उघडकीस आणला असून, ७ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. माळेगाव परिसरात वाहन चोरीच्या वाढत्या घटनांमुळे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी गुन्हे शोध पथकाला विशेष निर्देश दिले होते. त्यानुसार पथकाने तपास आणि गस्तीवर विशेष लक्ष केंद्रित केले होते.

२८ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री १ ते पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान, राजहंस चौक, शनी मंदिरासमोरील मोकळ्या जागेतून फोर्स मोटर्स कंपनीचा पांढऱ्या रंगाचा टेम्पो ट्रॅव्हलर मिनीबस चोरीला गेला होता. याबाबत सचिन बाबासो कोकरे (रा. धुमाळवाडी, ता. बारामती) यांनी माळेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर गुन्हे शोध पथकाने



तातडीने तपासाला सुरुवात केली. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयित प्रदिप रामचंद्र शिंदे (रा. हावागज, ता. बारामती) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने चोरीची कबुली दिली, आणि पोलिसांनी त्याच्याकडून ७ लाख रुपये किमतीची चोरीला गेलेला मिनीबस जप्त केली.

गुन्हा दाखल

या प्रकरणी माळेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २२३/२०२५ अन्वये इछड कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार राहुल पांढरे करत आहेत. या यशस्वी कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

कारवाईत सहभागी पथक

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शोध पथकात पोलीस उपनिरीक्षक देविदास साळवे, पोलीस हवालदार राहुल पांढरे, विजय वाघमोडे, अमोल राऊत, ज्ञानेश्वर मोरे, नितीन कांबळे आणि अमोल वाघमारे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

माळेगाव परिसरातील वाहन चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र, या कारवाईमुळे पोलिसांप्रती विश्वास वाढला असून, परिसरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पथकाचे कौतुक होत आहे. पोलिसांनी आता अशा घटनांना आळा घालण्यासाठी गस्त आणि तपास आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

## महापालिकेसाठी नवं 'सुरक्षा दल' सज्ज ; क्युआरटीची पहिली तुकडी उद्यापासून सक्रिय

**पुणे । प्रतिनिधी**

**महापालिकेच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले, आंदोलने व महापालिकेच्या मिळकतींवर घडणारे गैरप्रकार रोखण्यासाठी महापालिकेकडून शीघ्र कृती दल (क्युआरटी) स्थापन करण्यात आले आहे. या क्युआरटी पथकातील दहा जणांची पहिली तुकडी उद्या (सोमवार) पासून मुख्य इमारतीच्या सुरक्षिततेसाठी सेवेत रुजू होणार आहे. काही दिवसांपूर्वी आयुक्त कार्यालयात झालेल्या गोंधळानंतर प्रशासनाकडून सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



महापालिकेच्या अतिक्रमण, आकाशचिन्ह व बांधकाम विभागांच्या कारवाईवेळी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर वारंवार जीवघेणे हल्ले होतात. त्याचबरोबर परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालयांवर आंदोलने, मोर्चे निघतात. महापालिकेच्या मिळकतींच्या ठिकाणीही अनेक गैरप्रकार घडतात. या घटनांना आळा घालण्यासाठी सुरक्षा विभागाला क्युआरटीची जोड देण्यात आली आहे. महापालिकेकडे सध्या १२०० सुरक्षा कर्मचारी आहेत.

त्यापैकी ५० कर्मचाऱ्यांची क्युआरटीसाठी निवड करण्यात आली असून, प्रशिक्षित दहा कर्मचाऱ्यांची पहिली तुकडी १ सप्टेंबरपासून कार्यरत होईल. पुढील टप्प्यात महापालिकेच्या पाच परिमंडळांत प्रत्येकी पाच जणांचे क्युआरटी पथक नियुक्त केले जाईल. अतिक्रमण, आकाशचिन्ह विभाग, १५ क्षेत्रीय कार्यालये, वाहन विभाग, कचरा डेपो, उद्याने, पाण्याच्या टाक्या अशा ठिकाणीही या पथकांची नेमणूक होणार आहे. याबाबत सुरक्षा अधिकारी राकेश विटकर यांनी सांगितले, की महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी क्युआरटी तयार करण्यात आले आहे. पहिली तुकडी १ सप्टेंबरपासून सेवेत रूजू होत असून, सुरुवात मुख्य इमारतीपासून केली जाणार आहे. त्यानंतर परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालयांनाही सुरक्षा दिली जाईल.

## मेट्रोचा आळंदीपर्यंत विस्तार होणार - केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

विश्रांतवाडी : मेट्रोचे विस्तारीकरण करत सर्व नागरिकांचा प्रवास सुखकर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यानुसार विश्रांतवाडीमार्गे मेट्रो आळंदीपर्यंत जोडण्यात येणार आहे. त्यासाठी बैठका घेऊन सविस्तर चर्चा होत असते. मागील आठवड्यात देखील महामेट्रोचे सर्व अधिकारी व संचालक श्रावण हर्डीकर यांच्याशी चर्चा करून प्रस्ताव तयार करायला सांगितला आहे.

विश्रांतवाडीमार्गे आळंदीपर्यंत मेट्रो सुरू करावी, यासाठी माजी नगरसेवक अनिल (बॉबी) टिंगरे हे माझ्याकडे वारंवार पत्रव्यवहार करून पाठपुरावा करत असतात. त्यामुळे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या समाधिस्थळापर्यंत मेट्रो जोडणार असल्याचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

मेंटल कॉर्नर येथील नानासाहेब परूळेकर विद्यालयात खासदार जनसंपर्क सेवा अभियान पार पडले. यावेळी मोहोळ बोलत होते. याप्रसंगी आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार जगदीश मुळीक, उपायुक्त सोमय मुंडे, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, माजी नगरसेवक अनिल टिंगरे, योगेश मुळीक, संदीप जऱ्हाड, राहुल भंडारे, सुनीता गलांडे, श्वेता गलांडे, ऐश्वर्या जाधव, मंगेश



गोळे, संतोष खांदवे, संदीप मोझे, गणेश बाबर, सुनील खांदवे, प्रीतम खांदवे, मोहनराव शिंदे, अर्जुन जगताप, सुभाष चव्हाण, शैलजीत बनसोडे, धनंजय जाधव, पूजा जाधव, लिंगु साखरे, जितेंद्र जगताप, ॲड.नितीन कुचेकर यांची उपस्थिती होती. शामा जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

मोहोळ म्हणाले, आळंदी हे वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असून महाराष्ट्रातील लाखो भाविक तेथे येतात. पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण असेल मोठ्या प्रमाणात वारकरी संप्रदाय, भाविकांची ये-जा असते. त्यामुळे त्यांना सोयीचे होण्याकरता आळंदीला मेट्रोने जोडण्याचा विचार निश्चित केला जाणार असल्याचे मत यांनी व्यक्त केले.

मेट्रोच्या मागणीला यश मिळणार याचे समाधान : अनिल टिंगरे

विश्रांतवाडी चौकातील उड्डाणपुल व ग्रेड सेपरेटरच्या (भुयारीमार्ग) आराखड्यात अनेक त्रुटी होत्या. त्यात मेट्रो प्रकल्पाचे नियोजनही करण्यात आले नव्हते. दूरदृष्टीचा विचार करत मेट्रो प्रकल्पाच्या नियोजनासह उड्डाणपूल करण्याची मागणी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ व पालिकेकडे केली होती.

त्या मागणीनुसार मेट्रोचे विश्रांतवाडीमार्गे आळंदीपर्यंत विस्तारीकरण करण्यात येणार आहे. मेट्रो सुरू झाल्यानंतर सर्वांचा प्रवास जलद व सुखकर होणार आहे. आपण मेट्रोच्या विस्ताराबाबत केलेल्या मागणीला यश मिळणार असल्याचे समाधान वाटत आहे.

## सविंदणेत भव्य रक्तदान शिबिर संपन्न; लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिरूर । प्रतिनिधी**

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान या सामाजिक संदेशाला बळ देत सविंदणे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात रविवारी (३१ ऑगस्ट २०२५) भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या संचालिका पूर्वाताई दिलीपराव वळसे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर-आंबेगाव महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा आणि माजी सरपंच शुभांगी पडवळ यांच्या पुढाकाराने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

उद्घाटन आणि रक्तदात्यांचा सहभाग

शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र गावडे आणि सरपंच मनीषा नरवडे यांच्या हस्ते झाले. या शिबिरात ६१ रक्तदात्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन रक्तदान केले आणि समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र आणि टी-शर्ट भेट म्हणून देण्यात आले. विशेष म्हणजे, लकी ड्रॉमधून खंडू कारभारी लंघे (सविंदणे) आणि पियुष दिलीप पोखरकर (वडगाव पीर) यांनी सायकल बक्षिस जिंकले.



गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवल्याने शिबिराला भव्य स्वरूप प्राप्त झाले. या कार्यक्रमाला राजेंद्र गावडे, मनीषा नरवडे, उपसरपंच गोरक्ष लंघे, माजी सरपंच सोनाली खैरे, वसंत पडवळ, भाऊसाहेब लंघे, मोहन किठे, चेअरमन शोभा लंघे, माजी चेअरमन रामदास पडवळ, ग्राहक पंचायतीचे तालुकाध्यक्ष अरूणकुमार मोटे, बाळासाहेब भोर, बाळासाहेब लंघे, फकीरा लंघे, ग्रामपंचायत सदस्या मालुबाई मिंडे, माऊली पुंडे, पोपट पडवळ, पी.डी. नरवडे, वसंत नरवडे, चेतन पडवळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय पथकाचे योगदान

वैद्यकीय अधिकारी डॉ. सौरभ ढमढेरे, आरोग्य सेवक डॉ. विनायक गोसावी आणि सेविका तेजवंती नैताम यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब भोर यांनी केले, तर दिलीप नरवडे यांनी आभार मानले. या शिबिराने रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले आणि गावकऱ्यांनी दाखवलेल्या सहभागाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्यास मदत होते, असे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

## धडकी भरवणाऱ्या आवाजाला चाप ; १८ बुलेट्सवर पोलिसांची कारवाई

लोणी काळभोर - कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेटवर लोणी काळभोर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून एकाच दिवसात सायलेन्सरमधून फटाका फोडणाऱ्या १८ बुलेटवर १८ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. यापुढे ही कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट्स वर कडक कारवाई करणार आहे, असा कडक इशारा लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिला आहे.

लोणी काळभोर हद्दीत बुलेट चालक सायलेन्सर बदलून त्यामधून फटाके फोडत आहेत. या आवाजामुळे नागरिकांना धडकी भरत असून लहान मुले व रुग्णांना याचा धोका निर्माण झाला आहे. अशा अनेक तक्रारी लोणी काळभोर पोलिसांना मिळाल्या होत्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पन्हाळे यांनी तीन पथके तयार करून कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने (दि.३०) दिवसभर चौका- चौकात थांबून व पाठलाग करून १८ बुलेट गाड्या पकडल्या.

पोलिसांनी कारवाईत बुलेटचे मॉडिफाइड सायलेन्सर, बिगर नंबर प्लेट, रूट्स हॉर्न अशा एकूण १८ गाड्यांचे सायलेन्सर, हॉर्न्स काढून घेतले आहेत. ज्या गाड्यांना नंबर प्लेट नव्हत्या त्यांना नंबर प्लेट बसवूनच गाड्या सोडून दिल्या. १८ बुलेटवर सुमारे १८ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. लोणी काळभोर पोलिसांच्या कारवाईमुळे बुलेटचा धडकी भरणाऱ्या आवाजाला चाप बसणार आहे.

ही कारवाई लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे, हवालदार रामहरी वणवे, वैजिनाथ शेलार, संदीप जोगदंड, रवी आहेर, महेश चव्हाण, सुनील नागलोत, प्रदीप क्षीरसागर, तेज भोसले, सूरज कुंभार, राहुल कर्डिले, संदीप धुमाळ, मंगेश नानापुरे, ईश्वर भगत, बालाजी बांगर व लोणी काळभोर वाहतूक शाखेचे हवालदार सतीश टेंगले, सचिन कांबळे यांच्या पथकाने केली आहे.

## हांडेवाडी चौकात भीषण अपघात; दोन तरुणांचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

**हांडेवाडी चौक ते मंतरवाडी चौक मार्गावर शेल पेट्रोल पंपाजवळ झालेल्या भीषण अपघातात बजाज पल्सर मोटरसायकलवरील दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. ट्रकखाली आलेल्या या अपघाताने परिसरात एकच खळबळ उडाली.**

मृतांची ओळख पटविण्यात आली असून मृतदेह पुढील तपासासाठी ससून हॉस्पिटल येथे हलविण्यात आले आहेत. दरम्यान, अपघातानंतर तातडीने पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि ट्रक चालकास ताब्यात घेतले. पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती फुरसुंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी दिली.

घटनास्थळी काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती, मात्र पोलिसांनी तातडीने ती सुरळीत करण्यात आली. दरम्यान, शहरात दिवसा जड वाहनांवर बंदी असतानाही अशा वाहनांची वर्दळ अनेक ठिकाणी होत असल्याकडे लक्ष वेधले जात आहे. यामुळे अपघाताच्या घटना वारंवार घडत असून, ट्रक चालक व मालकांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## पुणे विद्यापीठाचं संकेतस्थळ हॅक? ; थाई भाषेतील जुगाराच्या जाहिरातींचा गोंधळ

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संकेतस्थळ उघडले असता, त्यावर थाई भाषेतील मजकूर दिसत असल्याने हे संकेतस्थळ हॅक झाल्याची शंका विद्यार्थ्यांनी उपस्थित केली आहे. असा प्रकार याआधीही झाला असल्याने विद्यापीठाकडे असलेली विद्यार्थ्यांची खासगी आणि गोपनीय माहिती कितपत सुरक्षित आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. विद्यापीठाने याबाबत जाहीर प्रकटन द्यावे, अशी मागणी विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे राहुल ससाणे यांनी केली आहेत.

गुगलवर विद्यापीठाबद्दल माहिती शोधण्याचा प्रयत्न केला असता, विद्यापीठाच्या संकेतस्थळाखाली थाई भाषेतील जुगाराच्या खेळांची जाहिरात दिसते. ज्या ठिकाणी विद्यापीठाच्या माहिती हवी, त्या ठिकाणी थाई भाषेतील मजकूर निदर्शनास येत असून त्यामध्ये पीजीएसएलओटी स्लॉट, जिली आणि पीपीसारख्या खेळांचे प्रात्याक्षिके असलेला १०० खरा गेम खेळण्याची आनंद घ्या. हा ऑनलाइन खेळ २०२५ मध्ये उपलब्ध असलेला सर्वोत्तम कसिनो खेळ असून १०० टक्के सुरक्षित आहे.

पुणे विद्यापीठात दरवर्षी हजारो विद्यार्थी दरवर्षी प्रवेश घेत असतात. प्रवेशा वेळी, परीक्षेच्या कालावधीत, प्रमाणपत्र मिळवताना आणि इतर अनेक कारणांसाठी विद्यार्थ्यांना या संकेतस्थळावर त्यांचे आधारकार्ड, इमेल, मोबाइल नंबर आदींची माहिती संकेतस्थळात भरावी लागते. त्यामुळे या संकेतस्थळावर उपलब्ध माहिती अतिशय संवेदनशील आहे. अशात जर हे संकेतस्थळ हॅक होत असेल, तर या माहितीचा गैरवापर केला जाऊ शकतो. त्यामुळे विद्यापीठाने याबाबत आधी जाहीर प्रकटन द्यावे. शिवाय संकेतस्थळाची सुरक्षितता अधिक मजबूत करावी, अशी मागणी विद्यार्थी करत आहेत.

## शिरोली बुद्रुक गावच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी स्वप्निल रोकडे, उपाध्यक्षपदी सचिन थोरवे यांची निवड

ओझर : शिरोली बुद्रुक गावच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी स्वप्निल जयसिंग रोकडे तर उपाध्यक्षपदी सचिन लक्ष्मण थोरवे यांची ग्रामसभेत एकमुखाने निवड करण्यात आली. १ सप्टेंबर रोजी शिरोली बुद्रुक ग्रामपंचायतच्या वतीने गावाचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराज मंदिरात ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये तंटामुक्ती अध्यक्षाची निवड झाली.

यावेळी विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, गावचे सरपंच प्रदीप थोरवे,उपसरपंच वैशाली थोरवे, ग्रामपंचायत सदस्य प्रथमेश थोरवे, प्रसाद थोरवे, अश्विनी शेरकर, सुगंधा थोरवे, प्रथमेश थोरवे, अक्षय विधाटे, सुभाष थोरवे, अँड अविनाश थोरवे, पोलीस पाटील अमोल थोरवे, गणेश राऊत.प्रसाद थोरवे, विष्णू थोरवे, दत्तात्रय बोऱ्हाडे,नितीन विधाटे, बाळासाहेब विधाटे, गोरखनाथ उकिर्डे, विशाल थोरवे, रणजीत शेरकर, संतोष थोरवे, नितीन थोरवे,सुशांत खैरे,मारुती सरोदे नितीन पंडित, अनिल डबडे, प्रा. राजेंद्र थोरवे, योगेश हांडे,ग्रामसभेच्या सुरुवातीस ग्रामसभेपुढे येणारे



विषयाचे वाचन ग्रामसेवक कल्पना दुराफे यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांसाठी शासनातर्फे आलेल्या योजने बद्दल माहिती सांगण्यात आली.ग्रामसभेपुढे रस्त्याच्या समस्या, कोल्हापूर पद्धतीच्या बंधारा गळती व व इतर विषयांवर साधक बाधक चर्चा झाली. सभेमध्ये दारूबंदी विषयीचा ठराव घेण्यात आला व याविषयी पुढील कायदेशीर पूर्तता करण्याचे ठरले. सभेच्या शेवटी तंटामुक्ती अध्यक्ष निवडीबाबत विषय मांडण्यात आला.

यावेळी सचिन थोरवे, नितीन पंडित, स्वप्नील रोकडे, विशाल थोरवे यांनी अध्यक्ष होण्याबाबत उत्सुकता दाखवली. यावेळी एक मुखाने बिनविरोध स्वप्निल रोकडे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी सचिन थोरवे यांची निवड झाली.गावच्या वतीने मावळत्या अध्यक्ष सुधीर देवणे यांचा सत्कार करण्यात आला. तर सत्यशील शेरकर, सरपंच प्रदीप थोरवे व उपस्थित ग्रामस्थांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित अध्यक्ष स्वप्निल रोकडे व उपाध्यक्ष सचिन थोरवे यांचा सत्कार करण्यात आला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रोच्या पादचारी पुलाचे उद्घाटन!

पुणे - पुणे मेट्रोच्या छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानक ते शनिवार पेठ यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या पादचारी पुलाची रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि आदर्श असून हा स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. पुलामुळे पेठेतील नागरिकांना मेट्रोने प्रवास करण्याची चांगली सुविधा निर्माण झाली आहे, असे यावेळी फडणवीस म्हणाले.

यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते. पुणे मेट्रोच्या टप्पा १ अंतर्गत वनाझ स्थानक ते





रामवाडी या मार्गादरम्यान डेक्कन जिमखाना आणि छत्रपती संभाजी उद्यानाला पेठ भागाशी जोडण्यासाठी दोन पुलांचे नियोजन करण्यात आले होते. यापैकी छत्रपती संभाजी उद्यान ते शनिवार पेठ या पादचारी पुलाचे काम पूर्ण झाले आहे. या पुलामुळे मुठा नदीच्या पलिकडे शनिवार पेठ, नारायण पेठ आणि परिसरातील नागरिकांना छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानकात येणे सुलभ होणार आहे. भारतातील पहिला ७० डिग्री कललेला कॉंक्रीटचा पायलन या पुलामध्ये आहे. उच्च तणावक्षमता असलेल्या २० केबल्स पुलाचा भार उचलण्यासाठी बसविण्यात आला आहे. पुलाची एकूण लांबी १७९.७९१ मीटर तर रुंदी ८ मीटर आहे. या पुलाची रचना अत्याधुनिक 'केबल स्टेड ब्रिज' या तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आली आहे.या पुलासाठी नदीपात्रात केवळ दोन खांब उभारण्यात आल्याने नदीच्या प्रवाहाला अडथळा होणार नाही. पादचारी पुलाजवळ बालगंधर्व रंगमंदिर असल्याने पुण्याच्या सांस्कृतिक वारशाला अनुसरून पुलाची रचना तानपुऱ्यासारखी करण्यात आली आहे. पुलामध्ये अभियांत्रिकी आणि कलेचा उत्तम संगम साधण्यात आला आहे.